मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २३५ ■ गुरुवार, ०७ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा"

### प्रथम क्रमांक मानकरी ग्रामपंचायतीला ०१ लाख रुपये बक्षिस

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)** : पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती, कष्टकऱ्यांचे द्रष्ट नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३८ व्या पुण्यतिथी निमित्ताने गुरुवार दिनांक ०७ मे रोजी सायंकाळी ०६ वाजता उलवे नोड मध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध समाजोपयोगी कार्यक्रम होणार आहेत. त्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या पनवेल तालुकास्तरीय "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२६"मध्ये प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या ग्रामपंचायतीला ०१ लाख रूपये, द्वितीय क्रमांकास ५० हजार रुपये, तृतीय क्रमांकास २५ हजार रुपये तर उत्तेजनार्थ दोन ग्रामपंचायतीला प्रत्येकी ११ हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

उलवे नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर मैदान येथे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभाला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव व पनवेल महापालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, उपमहापौर प्रमिला पाटील, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य अनिल भगत, प्रकाश भगत, संजय भगत, वसंत पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. या समारंभात स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कारसोबत पनवेल उरण तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा सत्कार त्याचबरोबरीने शिक्षण, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या गुणिजनांचा पारितोषिक सन्मान समारंभ आणि 'द फोक मराठी' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

# शासकीय कर्मचाऱ्यांना हिंदी भाषा परीक्षेची सक्ती

## मराठी अभ्यास केंद्राचा आंदोलनाचा इशारा

**मुंबई :** राज्य शासनाच्या भाषा संचालनालयाने राज्याच्या सेवेत असलेल्या राजपत्रित अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी हिंदी भाषा निम्न श्रेणी व उच्च श्रेणी परीक्षा २८ जून रोजी घेण्याची घोषणा केली आहे. या परीक्षेला मराठी अभ्यास केंद्राने विरोध केला आहे. मराठी भाषिक राज्यात हिंदीची परीक्षा बहुतांश मराठी भाषिक असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीचा भाग म्हणून घेण्याची आवश्यकताच काय ? असा सवाल करत प्रस्तावित हिंदी परीक्षा तत्काळ रद्द करावी, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा केंद्राने दिला आहे.



राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी हिंदी भाषा निम्नश्रेणी व उच्चश्रेणी परीक्षा मुंबई, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या चार विभागीय कार्यालयांच्या ठिकाणी घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी अर्ज करण्याची मुदत २० मे देण्यात आली आहे.

या परीक्षेलाच आता मराठी अभ्यास केंद्राने आव्हान दिले आहे. शासकीय कर्मचाऱ्यांना हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक करून त्यासाठी परीक्षा घेणे हा निव्वळ खोडसाळपणा आणि राजभाषा मराठीचा अवमान असल्याचा आरोप मराठी अभ्यास केंद्राने केला आहे. हिंदी ही महाराष्ट्राची राजभाषा नाही.

तसेच राज्यात हिंदी साक्षरतेचे प्रमाणही प्रचंड असल्याने या दोन्ही भाषांमध्ये खूप साधर्म्य आहे. मराठी माणसाला हिंदीतून कामचलाऊ व्यवहार करण्यात कोणतीही अडचण नाही. असे असतानाही हिंदी परीक्षेची अट का असा सवाल केंद्राने उपस्थित केला आहे.

तमिळनाडूमध्ये किंवा कर्नाटकात हिंदीची सेवांतर्गत परीक्षा घेतली जाते का? गुजरात किंवा पश्चिम बंगालमध्ये अशी परीक्षा होते काय? की महाराष्ट्र सरकारने स्वतःहूनच हिंदीच्या परीक्षेचे हे लोढणे मराठी भाषिक कर्मचाऱ्यांच्या गळ्यात अडकवले आहे? असा संतप्त सवाल मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष डॉ.दीपक पवार यांनी उपस्थित केला आहे.

अमराठी भाषिक कर्मचाऱ्यांच्या मराठीच्या ज्ञानाकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता असताना अनावश्यक हिंदी परीक्षा घेऊन शासन वेळ आणि पैसा दोन्हींचाही अपव्यय करत असल्याचा आरोपही पवार यांनी केला आहे.



# निफाड तालुक्यात 'शिवरस्ते' मोजणीचा ऐतिहासिक विक्रम

## एकाच दिवसात सात शेतरस्त्यांचे मोजमाप पूर्ण; शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी /राहुल कुलकर्णी** : निफाड तालुक्यात प्रशासन आणि शेतकरी संघटनांच्या समन्वयातून 'शिवरस्ते' मोजणी मोहिमेत ऐतिहासिक कामगिरी नोंदवण्यात आली आहे. महसूल व भूमी अभिलेख विभागाच्या संयुक्त विद्यमाने अवघ्या एका दिवसात सात गाव नकाशांवरील शेतरस्त्यांची मोजणी पूर्ण करण्यात आली. तालुक्यातील प्रलंबित शेतरस्त्यांच्या प्रश्नांवर मार्ग मोकळा करणारी ही मोहीम ठरत असून, शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे तसेच भूमी अभिलेख उपअधीक्षक भाबड यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. 'महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेत रस्ते चळवळ कृती समिती'च्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या मोहिमेला गती मिळाली असून प्रशासन आणि शेतकरी यांच्यातील प्रभावी समन्वयाचे हे उत्कृष्ट उदाहरण मानले जात आहे.

मोहिमेदरम्यान म्हाळसाकोरे येथील भेंडाळी-वाळके वस्ती तसेच ढोबळे वस्ती रस्त्यांची मोजणी निमतानदार शशिकांत बैरागी व ग्राम महसूल अधिकारी कुलकर्णी यांच्या उपस्थितीत पार पडली. धारणगाव वीर ते धारणगाव खडक या महत्त्वपूर्ण शिवरस्त्याचे मोजमाप प्रतीक हजारे आणि गायकवाड यांनी पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने पूर्ण केले.

उंबरखेड ते पिंपळगाव मार्गाची मोजणी भुकरमापक शैलेशसिंग राजपूत व मंडळ अधिकारी बोडके यांच्या उपस्थितीत करण्यात आली. भुसे ते करजगाव या रस्त्याचे मोजमाप अभिलेखापाल प्रदीप कुटे यांनी एका बाजूने पूर्ण केले. दारणा सांगवी ते शिंपी टाकळी मार्गाचे मोजमाप भुकरमापक रुपेश पाटील यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केले.

तसेच दत्त मंदिर (दारणा सांगवी) ते डोंगरवाडी हिंगणवेढे या मार्गाच्या अर्ध्या भागाचे मोजमाप तनय विसपुते यांनी पूर्ण केले. दारणा सांगवी येथील म्हसोबा वाट ते सावळीवाट या शेतरस्त्याच्या मोजणीसाठी कांतीलाल बोडके यांनी विशेष परिश्रम घेत प्रक्रिया पूर्णत्वास नेली.

या मोहिमेत मंडळ अधिकारी घाडगे, शिरस्तेदार भारस्कर, विविध गावांचे ग्राम महसूल अधिकारी, पंचायत अधिकारी तसेच महसूल व भूमी अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. मोजणीदरम्यान कृष्णा मुरकुटे, सुभाष जाधव, विष्णू पुंड, भाऊसाहेब अहिरे यांच्यासह अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांनीही प्रशासनाला पूर्ण सहकार्य करत मोहीम यशस्वी करण्यात मोलाचा वाटा उचलला.

"निफाड तालुक्यात एकाच दिवशी सात शेतरस्त्यांची मोजणी होणे हा ऐतिहासिक उच्चांक आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात जाण्याच्या मार्गातील अडचणी दूर होतील आणि शेती कामांना गती मिळेल," असे मत 'शिव पाणंद शेत रस्ते चळवळ कृती समिती'चे सदस्य विजय दरेकर यांनी व्यक्त केले.

या उपक्रमाबद्दल कृती समितीचे योगेश अडसरे, सुरेश वाटपाडे, दशरथ शिंदे, नवनाथ सालगुडे आणि गणेश जाधव यांनी प्रशासनाचे कौतुक केले. तालुक्यातील इतर प्रलंबित शेतरस्त्यांच्या मोजणी व विकासकामांनाही यामुळे गती मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**आमदार दिलीप बनकर यांचे कौतुक**

"निफाड तालुक्यात प्रशासनाने घेतलेला हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे. शेतकऱ्यांच्या दळणवळणाच्या मूलभूत समस्यांपैकी शेतरस्त्यांचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून तो मार्गी लावण्यासाठी अशा मोहिमा निर्णायक ठरतात. एकाच दिवशी सात रस्त्यांची मोजणी पूर्ण करणे हा निश्चितच उल्लेखनीय विक्रम आहे. यामुळे पुढील विकासकामांना गती मिळेल आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल. भविष्यातही अशा उपक्रमांना माझे पूर्ण सहकार्य राहील," असे मत आमदार दिलीप बनकर यांनी व्यक्त केले.

**शेती विकासाला चालना**

निफाड तालुक्यातील ही मोहीम केवळ प्रशासकीय आकडेवारीपुरती मर्यादित न राहता शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडवणारी ठरणार आहे. शेतात जाण्यासाठी सुकर रस्ते उपलब्ध झाल्यास उत्पादन खर्च कमी होण्यास, वेळेची बचत होण्यास आणि शेतीची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

त्यामुळे प्रशासनाने राबवलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

---

## संग्राम तोगरे आदिवासी वाडीला आनंद देणारा एक मोठ्या मनाचा माणूस !! - साहित्यरत्न प्रा.एल.बी.पाटील

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर** : समाज सेवेचे व्रत अंगी घेतलेले कवी संग्राम तोगरे हे मागील कित्येक वर्षांपासून विविध ठिकाणच्या डॉक्टरांकडे शिल्लक राहिलेली आणि गरीब पेशंटना उपयुक्त ठरणारी औषधे गोळा करून योग्य जागी पोहोचविण्यात तोगरे सतत सेवा करीत राहिले आहेत.ते सेवेचे व्रत करतांना त्यांनी काही दात्यांकडून धान्य,डाळ,कपडे गोळा करून गरजूंना दिले आहे. यावेळी आपल्या ७९ व्या वाढदिवशी तेली पाडा ( मुळेखंड ) येथील



नव्या आदिवासी वस्तीवर जाऊन ४० घरकुलांना वरील वस्तूंचे वाटप केले , त्यामुळे वाडीला आनंद देणारा एक माणूस आहेत असा विचार साहित्यरत्न रायगडभूषण प्रा एल बी पाटील यांनी वाटप प्रसंगी उपस्थितांसमोर मांडला. दाते चंद्रकांत ठक्कर यांनी ही संग्राम यांचे विषयी गौरवोद्गार काढून वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी समाजसेवेत मदत करणा-या संग्राम यांच्या पत्नी सौ.सुमन तोगरे,कार्यकर्ते रवी काटे (केगांव ), नक्षत्रा संग्राम,उमाजी लक्ष्मण पवार इत्यादी प्रमुखांची उपस्थिती होती.वाडीवरच्या तेथील उपस्थितांनी संग्राम तोगरे दांपत्याला भरभरून सदिच्छा दिल्या.

---

## गारपीट व वादळाचा आमगाव तालुक्यात कहर; धान पिकांचे १००% नुकसान, शेतकऱ्यांची तातडीच्या मदतीची मागणी

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : दुपारी सुमारे तीन ते चार वाजण्याच्या दरम्यान अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह गारपीट व मुसळधार पावसामुळे आमगाव तालुक्यात मोठा कहर झाला आहे. जामखारी, बिरसी, नांगटोला आणि जानकारी परिसरातील शेतकऱ्यांच्या उन्हाळी धान पिकांचे १०० टक्के नुकसान झाल्याचे समोर आले आहे. कापणीच्या उंबरठ्यावर असलेले पीक अक्षरशः जमीनदोस्त झाले असून शेतकऱ्यांच्या हातातील तोंडाचा घास हिरावला गेला आहे.

विशेषतः जानकारी येथील भूमीधारक शेतकरी मुनेश्वर शेषराव खोब्रागडे, विलास मेश्राम, श्रावण पटले, मुन्नालाल येडे, महेंद्र येडे, ओमप्रकाश खोब्रागडे, शैलेंद्र बोपचे,



युलाल सोनवणे या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. गारपीट व जोरदार वाऱ्यामुळे संपूर्ण धान पीक आडवे पडले असून दाण्यांची मोठ्या प्रमाणावर नासाडी झाली आहे. अनेक ठिकाणी शेतात पाणी साचल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

या भीषण नुकसानीमुळे शेतकरी पूर्णतः हतबल झाले असून त्यांनी शासन व प्रशासनाकडे तातडीने पंचनामे करून तत्काळ व योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. "आमच्या कष्टाचे सर्वस्व एका तासात उद्ध्वस्त झाले," अशी वेदना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, आमगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय पुराम यांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी त्वरित दखल घेतली असून आमगाव विधानसभा क्षेत्रातील तिन्ही तालुक्यांच्या तहसीलदारांना नुकसानग्रस्त भागांचा पंचनामा तातडीने करण्याचे निर्देश दिले आहेत.

आता शासन या गंभीर परिस्थितीकडे कितपत संवेदनशीलतेने पाहते आणि शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यांत आता एकच अपेक्षा – नुकसानभरपाईची आणि न्यायाची!

---

## नाशिक जिल्हास्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : स्पोर्ट्स किकबॉक्सिंग असोसिएशन, नाशिक आयोजित पाचवी जिल्हास्तरीय किक बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा नाशिक येथील विभागीय क्रीडा संकुल नाशिक येथे उत्सव संपन्न झाली

या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी राजेश डोळस, भूषण ओहोळ आणि खंडू घुगे

संस्थेचे अध्यक्ष संकेत चंद्रमोरे, उपाधक्ष्या सौ. कोमल शिंदे, सचिव संदीप बोरसे, खजिनदार मंगेश देठे तसेच सदस्य जयेश पगारे, श्वेतन पगारे आणि भूषण ठाकूर इत्यादी उपस्थित होते

जिल्हास्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी विविध खेळाडूंनी सहभाग घेतला या स्पर्धेत दिंडोरी, मालेगाव, नांदगाव, लासलगाव, येवला, चांदवड, इगतपुरी, सिन्नर आणि नाशिक ग्रामीण या तालुक्यांतील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या स्पर्धेत 69 खेळाडूंनी सहभाग नोंदवला या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक बालभारती पब्लिक स्कूल, दिंडोरी,द्वितीय पारितोषिक नांदगाव स्पोर्ट्स अकॅडमी व होरायझन अकॅडमी, नांदगाव





**विजेत्यांची राज्यस्तरासाठी निवड**

तृतीय पारितोषिक योद्धा क्लब, लासलगाव यांनी मिळवला या स्पर्धेत विजयी ठरलेल्या सर्व खेळाडूंची निवड पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी करण्यात आली असून, नाशिक जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामागे सर्व पदाधिकारी, आयोजक, पंच, प्रशांत आढाव, अनिकेत भवर, अक्षय चौधरी, नवनाथ नाईकवाडे, श्निनाद दाभाडे आणि . तेजस घुगे यांच्यासह सर्व स्वयंसेवकांनी घेतलेले परिश्रम कौतुकास्पद ठरले स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक खेळाडूने आत्मविश्वास, शिस्त आणि जिद्दीच्या बळावर उत्कृष्ट कामगिरी साकारत स्पर्धेची उंची वाढवली.

---

## नेपाळमधील आशियाई सवात चॅम्पियनशिपमध्ये भारताचा डंका; विजयी खेळाडूंचा पनवेलमध्ये जंगी सत्कार

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी** : नेपाळमधील काठमांडू युनिव्हर्सिटी, धुलीखेल येथे ३० एप्रिल ते ३ मे २०२६ या कालावधीत पार पडलेल्या ७ व्या आशियाई व इंटरनॅशनल सवात चॅम्पियनशिप २०२६ मध्ये भारतीय खेळाडूंनी देदीप्यमान कामगिरी करत आंतरराष्ट्रीय स्तरावर तिरंगा अभिमानाने फडकवला. या स्पर्धेत पदकांची लयलूट करणाऱ्या मास्टर भूपेंद्र मार्शल आर्ट स्पोर्ट्स अँड फिटनेस अकॅडमीच्या (MBMA) आणि महाराष्ट्राच्या सर्व विजयी खेळाडूंचा ५ मे रोजी पनवेलमध्ये भव्य सत्कार समारंभ पार पडला.

या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताकडून एकूण ७१ खेळाडूंनी सहभाग घेतला होता, त्यामध्ये महाराष्ट्रातील २४ खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत २ सुवर्ण, ७ रौप्य आणि १५ कांस्य पदके जिंकली. विविध राज्यातील खेळाडूंच्या एकत्रित योगदानामुळे भारताने आशियाई स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाची ट्रॉफी पटकावण्याचा बहुमान मिळवला.



महाराष्ट्राच्या गार्गी कुलकर्णी आणि अंजली चव्हाण यांनी सुवर्णपदकाला गवसणी घातली, तर आकांक्षा भालेकर, आर्या पवार, समृद्धी जुगदार, शिवम पाटील, श्रुतिका जाधव, वैष्णवी शिंदे आणि सार्थक महामुनी यांनी रौप्य पदके पटकावली. तसेच ऐश्वर्या नायक, अस्मि पाटील, वरद शेटे, मकरंद जुगदार, ध्रुव दिघाडे, अविर बनसोडे, प्रमोद ठोंबरे, आदित्य खंडीझोड, यश मोरे, ध्रुव कोलतेकर, ईश्वरी डेरे आणि स्वयम् शिंदे यांनी कांस्य पदक जिंकून देशाचे नाव उंचावले. 'हिमालयन इंटरनॅशनल सवात चॅम्पियनशिपमध्ये सिद्धी जोगदार, मंथन रोटे आणि आराध्या भोसले यांनी कांस्य पदकाची कमाई केली.

पनवेल येथील खांदा कॉलनीतील सीकेटी कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित या कार्यक्रमात अकॅडमीच्या खेळाडूंचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. या यशानंतर खेळाडूंची विजयी मिरवणूक काढण्यात आली, ज्यामध्ये स्थानिक नागरिक, क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळताना आलेले दडपण आणि त्यावर मात करून मिळवलेले यश हा प्रवास अत्यंत कठीण पण प्रेरणादायी असल्याचे खेळाडूंनी सांगितले. या यशात खेळाडूंसोबतच प्रशिक्षक व पंचांचेही मोठे योगदान राहिले. राष्ट्रीय संघ प्रशिक्षक सुहास धाईंजे, आशिया पंच राहुल पवार आणि भूपेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी हा विजय साकारला. तसेच भूपेंद् गायकवाड, धनेशा शिंगोटे, राहुल पवार आणि सुशांत पोळ यांनी जज व रेफ्री म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट जबाबदारी पार पाडली. आशियाई स्तरावरील या यशानंतर आता भारतीय खेळाडूंचे लक्ष्य सप्टेंबर २०२६ मध्ये फ्रान्स येथे होणाऱ्या सवात वर्ल्ड चॅम्पियनशिपकडे लागले आहे. आता आशियानंतर जग जिंकायचं या निर्धाराने खेळाडू अधिक जिद्दीने सरावाला लागले आहेत. या यशामुळे केवळ पनवेलचेच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे, देशाचे नाव क्रीडाविश्वात उंचावले असून विजयी खेळाडूंवर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

---

## शिवसेना (उबाठा) पक्षाने पनवेल महानगरपालिकेची शिवसेना शाखा तोड कारवाई परतावली

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : कळंबोली शिर्के कॉलनी येथील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची असलेली शाखा पनवेल महानगरपालिका व पोलीस प्रशासन मोठ्या फौजफाट्यासह आज तोडण्यासाठी आले होते. परंतु या कारवाईला शिवसैनिकांनी कडाडून विरोध केल्याने अखेरीस अतिक्रमण विभागाला माघार घेत परतावे लागले आहे.

शिवसेना पक्षाची शाखा म्हणजे शिवसैनिकांची एक अस्मिता आहे व मंदिर आहे. परंतु





आज पनवेल महानगरपालिका तसेच प्रशासन यांनी ही शाखा तोडण्याचा प्रयत्न केला होता. परंतु याला रस्त्यावर उतरुन शिवसेना उपनेते बबनदादा पाटील, जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांच्यासह उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, पनवेल तालुका संघटक दिपक निकम, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, अॅड. समाधान काशिद, शहरप्रमुख सुर्यकांत म्हसकर, संदीप तांडेल, महिला आघाडीच्या ज्योती मोहिते, जमील खान, विश्वास पेटकर आदींसह मोठ्या संख्येने जमलेल्या शिवसैनिकांनी उपस्थित राहून या कारवाईला ठोस विरोध केला. या संदर्भात कळंबोली पोलीस ठाणे व पनवेल महानगरपालिका यांना निवेदन देवून ही कारवाई न करण्यासंदर्भात शिवसेनेतर्फे मागणी करण्यात आली आहे. अखेरीस पनवेल महानगरपालिका प्रशासन व पोलीस प्रशासनाला कारवाई न करता मागे हात हलवत परत जाण्याची वेळ आली.

---

## चि.पवन संभाजी घोलपचे आंतरराष्ट्रीय यश; इटलीतील शिक्षणातून जागतिक मान्यता

**दैनिक युवक आधार**
**सणसर/विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील उदमाईवाडी गावचा चि.पवन संभाजी घोलप याने इटली येथे उच्च शिक्षण घेत असलेला जगातील सर्वात प्रतिष्ठित वैज्ञानिक नियतकालिकांपैकी एक International Physics Forum, United States of America मध्ये आपला संशोधन निकाल प्रकाशित करून अभिमानास्पद यश मिळवले आहे. इटालियन



आणि आंतरराष्ट्रीय प्रतिभांचा सहभाग असलेल्या या संशोधन टीममध्ये सामील होणारा पवन हा पहिला भारतीय विद्यार्थी ठरला आहे.

अवघ्या वीस वर्षांचा असताना आंतरराष्ट्रीय विद्यार्थी म्हणून निवड होणे ही मोठी कामगिरी मानली जात असून सध्या पवन इटली आणि जर्मनी या दोन देशांकडून डिग्री घेत असून अमेरिकेतील Stanford University मध्ये रिसर्च कार्यरत आहे.त्याच्या शैक्षणिक प्रवासाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.पवनच्या या यशाबद्दल ग्रामस्थांनी त्याचे आणि कुटुंबाचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. त्याच्या मेहनतीचे आणि प्रतिभेचे कौतुक करून उदमाईवाडी ग्रामस्थांनी अभिमान व्यक्त केला आहे. चि.पवन संभाजी घोलप याचे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे यश हे केवळ त्याच्या कुटुंबासाठीच नव्हे तर संपूर्ण गावासाठी अभिमानास्पद आहे.त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचाली साठी सर्वांनी शुभेच्छा देऊन कौतुक केले आहे.

## संक्षिप्त

### ड्राय डेच्या दिवशी मद्य विक्री

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** ड्राय डेच्या दिवशी मद्य विक्री केल्याप्रकरणी चौघा विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात दोन मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. एक मे रोजी आमंत्रण किचन अँड बार, पंचरत्न चौक ते उरण नाका रोडवर ड्रायडे असताना देखील मद्य विक्री होत असल्याची माहिती पनवेल पोलिसांना मिळाली. रोहन रत्नाकर हेगडे (चालक), हरीश नारायण शेट्टी (मौरया गार्डन विचुंबे) अनिल रामराव तायडे (मॅनेजर), तानाजी मल्लिकार्जुन शिंदे (कॅशियर) यांनी ड्रायडे (मद्य विक्री करण्यास मनाई आदेश )आणि शर्तीपेक्षा जास्त वेळ 279 वेगवेगळ्या कंपनीच्या आणि ब्रँडच्या व्हिस्की, रम, वोडका, वाईन आणि बियरच्या बाटल्या विक्री करत असताना पनवेल शहर पोलिसांना मिळून आले. पनवेल शहर पोलिसांनी एक लाख 66 हजार पाचशे तीन रुपयांचे मद्य आणि मद्य विक्रीतील रोख रुपये जप्त केले.

### 14 लाख 25 हजारच्या दागिन्यांची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : चोराने घरात प्रवेश करून 14 लाख 25 हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात पाच मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.अक्षय प्रताप पाटील हे देवदगाव, अनमोल रेसिडेन्सी येथे राहत असून त्यांच्या घराच्या दरवाज्यातून चोराने आत मध्ये प्रवेश केला आणि लोखंडी कपाटातील सोन्याची गंठण, सोन्याचा राणीहार, सोन्याच्या अंगठ्या, सोन्याची चैन, सोन्याचे बदाम असा एकूण 14 लाख 25 हजारांचा ऐवज चोरून नेला.

### खुर्ची आणि काठीने केली मारहाण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** गल्लीत खेळणाऱ्या मुलांचा बॉल फिर्यादी यांच्या मुलीला लागला असता याबाबत विचारणा केली असता दोन अनोळखी इसमानी लाथा बुक्क्यांनी, खुर्च्या आणि काठीने मारहाण केल्याची घटना खारघर येथे घडली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात 5 मे रोजी चार अनोळखी इसमा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.5 मे रोजी चेतन कसभले (राहणार सेक्टर 12 खारघर) हे त्यांच्या घरातून मुलीसोबत ते काम करत असलेल्या भाजप पक्ष कार्यालय सेक्टर १३ या ठिकाणी जात होते. गल्लीत खेळणाऱ्या मुलांचा बॉल त्यांच्या मुलीला लागला असता तर अशी त्यांनी विचारणा केली. यावेळी दोन मुलांनी त्यांच्याशी हूज्जत घातली आणि काही वेळानंतर ते काम करत असलेल्या भाजप पक्ष कार्यालय या ठिकाणी अनोळखी दोन इसम आले आणि त्यांनी लाथाबुकयांनी, खुर्ची आणि काठीने मारहाण करून त्यांना जखमी केले.

# आदिवासी विकास विभागासाठी पेन्शन व ई-टेंडरिंग विषयक मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव**

**वाडी नागपूर** : आदिवासी विकास विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (NPS), सुधारित राष्ट्रीय पेन्शन प्रणाली, युनिफाईड पेन्शन स्कीम, ई-टेंडरिंग आदी विषयांवर वनमती येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत प्रकल्प अधिकारी नितीन इसोकर प्रमुख उपस्थित होते. कार्यशाळेत सहसंचालक (लेखा व कोषागारे) नागपूर येथील लेखाधिकारी शैलेश कोठे यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी विविध योजना व शासकीय धोरणांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.

या कार्यशाळेस अनुदानित आश्रमशाळा, शासकीय आश्रमशाळा, प्रकल्प कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच आदिवासी विभागाच्या शासकीय विद्यार्थी वसतिगृहांचे गृहपाल व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना विनोद बोरघाटे यांनी मांडली, तर आभार मिथलेश सोनकामले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक प्रकल्प अधिकारी राहुल काकडे, मनोज तेलंग,




आशीष कंगाली, हेमंत कोचे, सचिन मांडवगले, पंकज हुरडे, विनोद गायकवाड, अश्विन डोंगरे, उमा देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

आदिवासी विकास विभाग में पेंशन स्कीमों पर कार्यशाला संपन्न

नागपुर - आदिवासी विकास विभाग के अधिकारियों एवं कर्मचारियों के लिए राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (NPS), सुधारित राष्ट्रीय पेन्शन प्रणाली, युनिफाईड पेन्शन स्कीम, ई टेंडरिंग आदि विषयों पर कार्यशाला का आयोजन वनमती में किया गया। इस कार्यशाला में प्रकल्प अधिकारी नितिन ईसोकर प्रमुख रूप से उपस्थित थे। कार्यशाला में सह संचालक लेखा व कोषागारे नागपुर के लेखाधिकारी शैलेश कोठे ने उपस्थित अधिकारी व कर्मचारियों का मार्गदर्शन किया इस दौरान उन्होंने विभिन्न स्कीमों और योजनाओं की जानकारी वहां पर उपस्थितों को दी।इस कार्यशाला में अनुदानित आश्रम शाला, शासकीय आश्रम शाला प्रकल्प कार्यालय के कर्मचारी व अधिकारी तथा आदिवासी विभाग के शासकीय छात्र-छात्राओं के वस्तीगृह के गृहपाल व कर्मचारी उपस्थित थे। कार्यक्रम की प्रस्तावना विनोद बोरघाटे ने रखी, जबकि आभार प्रदर्शन मिथलेश सोनकामले ने किया। सफलतार्थ सहायक प्रकल्प अधिकारी राहुल काकडे, मनोज तेलंग, आशीष कंगाली, हेमंत कोचे, सचिन मांडवगले, पंकज हुरडे,विनोद गायकवाड, अश्विन डोंगरे, उमा देशमुख आदि ने परिश्रम किया।

## धाराशिव-औसा मार्गावर भीषण अपघात; दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू, चार दिवसांत दुसरी घटना

**दैनिक युवक आधार**

**धाराशिव,प्रतिनिधी** : धाराशिव ते औसा दरम्यान सुरू असलेल्या रस्ता कामकाजामुळे आणखी एक जीवघेणी दुर्घटना घडली आहे. सांजा परिसरालगत अपूर्ण पुलाच्या कामामुळे खड्ड्यात दुचाकी कोसळून ओम अंधारे (रा. भंडारवाडी) यांचा जागीच मृत्यू झाला. संबंधित दुचाकी (क्रमांक MH 25 AU 6994, आर 15 यामा) चालवित असताना हा अपघात घडला.

माहितीनुसार, या मार्गावर सध्या रस्ता व पुलाचे काम सुरू असून अनेक ठिकाणी अपूर्ण बांधकाम आणि खोल खड्डे आहेत. विशेषतः सांजा परिसरातील अपूर्ण पुलाजवळ कोणतीही संरक्षण भिंत नसल्याने आणि दिशा दर्शक फलकांचा अभाव असल्याने अपघाताचा धोका अधिक वाढला आहे.

गेल्या चार दिवसांत या मार्गावर घडलेली ही दुसरी गंभीर घटना असल्याने स्थानिक नागरिक आणि प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दैनंदिन प्रवास करणाऱ्यांनी प्रशासनाच्या दुर्लक्षावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

स्थानिकांनी तातडीने योग्य सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी केली असून, अपूर्ण पुलाचे काम जलद गतीने पूर्ण करावे, संरक्षण भिंती उभाराव्यात तसेच स्पष्ट दिशा दर्शक फलक लावावेत, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा अशा अपघातांची मालिका सुरूच राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## सिल्लोड तालुक्यात १६ टँकरद्वारे पाणीपुरवठा १२ गावांत विहीर अधिग्रहण; सभापती सौ. अनिता बनकर यांच्याकडून उपाययोजनांचा आढावा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी**

**प्रमुख छत्रपती संभाजीनगर :** सिल्लोड तालुक्यातील ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई तीव्र झाली असून प्रशासनाकडून युद्धपातळीवर उपाययोजना राबवल्या जात आहेत. सोमवारपर्यंत तालुक्यातील १२ गावांना १६ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असून, अन्य १२ गावांत पिण्याच्या पाण्यासाठी खाजगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. "तालुक्यातील कोणत्याही गावाला पाणीटंचाई जाणवू देणार नाही," अशी माहिती पंचायत समिती सभापती सौ. अनिता सुरेश बनकर यांनी दिली.तालुक्यात सद्यस्थितीत वांगी, चिंचवन, वरुड (खुर्द), पिंपरी, बोदवड, सराटी, बोजगाव, मोढा (खुर्द) वाडी-वस्ती , वडोदचाथा, तलवाडा, आसडी व वडोदचाथा वस्ती या १२ गावांना १६ टँकरद्वारे ३१ खेपा सुरू आहेत. याव्यतिरिक्त पाणी उपलब्ध असलेल्या बोरगाव बाजार, मुकपाठ, दिडगाव, केऱ्हाळा, आसडी, म्हसला (बुद्रुक), धारला, गेवराई सेमी, अंधारी, बोरगाव कासारी व बनकिन्होळा या १२ गावांच्या पिण्याच्या पाण्यासाठी विहिरींचे यशस्वी अधिग्रहण करण्यात आले आहे.दरम्यान, पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागाकडे धावडा , लिहा आणि रेलगाव येथील परदेशी वाडी येथून टँकर सुरू करण्यासाठी नवीन प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. या प्रस्तावांची तांत्रिक निकष तपासून तातडीने कार्यवाही केली जाणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## माऊली प्रसाद बिल्डिंगमध्ये देहव्यापाराचा घाणेरडा खेळ उघड!" रसायनी पोलिसांचा धडक छापा; मुख्य सूत्रधार नीता गायकवाड अटकेत

**दैनिक युवक आधार**

**रसायनी:(आनंद पवार) :** रसायनी पोलीस ठाणेच्या हद्दीत असलेल्या चांभार्ली येथील माउली प्रसाद बिल्डिंगमध्ये सुरू असलेल्या देहव्यापाराच्या अड्ड्यावर सोमवार दि.४ मे रोजी सायंकाळी रसायनी पोलिसांनी धडक कारवाई करत मोठा पर्दाफाश केला. या कारवाईत मुख्य सूत्रधार असलेली नीता राहुल गायकवाड (वय३६) हिला अटक करण्यात आली असून, तीन पीडित मुलींचीही सुटका करण्यात आली आहे.प्राथमिक पोलीस तपासात समोर आलेल्या धक्कादायक माहितीनुसार आरोपी नीता गायकवाड ही चांभार्ली येथील माऊली प्रसाद बिल्डिंगमध्ये भाडेतत्त्वावर राहत होती.ती नोकरी व पैशांचे आमिष दाखवून अल्पवयीन व तरुण मुलींना आपल्या जाळयात ओढत होती. त्यानंतर त्यांना जबरदस्तीने देहव्यापारात ढकलून त्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक फायदा उचलत असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. मिळणाऱ्या पैशांवर स्वतःची उपजीविका करत होती.या धडक कारवाई दरम्यान पोलिसांनी खालील मुलींची सुटका केली. (नावे बदललेली) पूजा (वय २३ वर्षे) राणी (वय २८ वर्षे) मोनाली (वय १६ वर्षे ५ महिने)असून एका अल्पवयीन मुलीचा समावेश असल्याचे समोर आल्याने गुन्ह्याचे गांभीर्य अधिक वाढले आहे.गुप्त माहितीच्या आधारे रसायनी पोलिसांनी नियोजनबद्ध छापा टाकून हा प्रकार उघडकीस आणला. घटनास्थळावरून तीन पीडित मुलींना ताब्यात घेऊन त्यांना संरक्षण व समुपदेशनासाठी संबंधित विभागाकडे सुपूर्द करण्यात आल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

या प्रकरणी आरोपी महिलेविरुद्ध रसायनी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम आहे १४३ सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक अधिनियम कलम ४,५ बालकांचे लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम कलम१६,१७ प्रमाणे दाखल करण्यात आला असून मंगळवारी सदर महिला आरोपीला पनवेल न्यायालयात हजर केले असता तिला दोन दिवसाची पोलीस कोठडी मिळाली असल्याचे समजते. सदर घटनेची माहिती प्राप्त होताच खालापूरचे पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ.विशाल नेहूल यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली असून,रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली पथकाने ही धडक मोहीम यशस्वी केली. या गांभीर्यपूर्वक घटनेची फिर्याद रसायनी पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस कॉन्स्टेबल सोनम हरी शेळके यांनी दिली असून या कारवाईमुळे रसायनी परिसरात एकच खळबळ उडाली आहे. अशा बेकायदेशीर धंद्यांवर पोलिसांनी आणखी कठोर कारवाई करावी,अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. या घटनेचा पुढील तपास रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ हे करीत आहेत.

## कष्टाच्या इंधना ने मुलाने टाकला प्रगतीचा टॉप गेअर; कळंबोलीत रिक्षा चालकाच्या मुलाने घेतली सुवर्णभरारी

### 87 टक्के गुणांसह संकुलात पहिला येण्याचा बहुमान

**दैनिक युवक आधार**

**कळंबोली वार्ताहर** : आई-वडिलांनी केलेल्या काबाड कष्टाचे चीज कळंबोलीतील रिक्षाचालकाच्या मुलाने बारावीच्या परीक्षेत 87 टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक येण्याचा बहुमान पटकावला आहे. कळंबोलीत गेल्या 12 वर्षांपासून रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या दिलीप पांडुरंग चव्हाण यांच्या वैभव चव्हाण या मुलाने सुधागड विद्या संकुलात मराठी माध्यमात शिक्षण घेऊन 87 टक्के गुण प्राप्त करून वडिलांच्या कष्टाचे चीज करून सुवर्ण भरारी घेतली आहे. याच वैभवने दहावीच्या परीक्षेमध्ये सुद्धा 95 टक्के गुण मिळवून सुधागड विद्या संकुलात पहिला येण्याचा बहुमान पटकावला होता. वैभवने मिळवलेल्या या दैदीप्यमान यशाने या रिक्षा चालकांच्या कुटुंबांचे पारने फेडले आहे .त्यांच्या कुटुंबात आनंदाचा पारावार शिगेला पोहोचला आहे .आपण केलेल्या कष्टाचे चीज झाले आहे आणि आता त्याला आयआयटी मधून इंजिनिअरिंग क्षेत्रात चमकदार कामगिरी करावयाची आहे असे वैभव चव्हाण चे वडील दिलीप चव्हाण यांनी पुढारीशी बोलताना सांगितले आहे . या गुणवंत विद्यार्थ्यांचे सुधागड विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी दूरध्वनीवरून अभिनंदन केले आहे.

कळंबोलीतील सुधागड विद्या संकुल हे शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांच्या प्ररणेनुसार या शिका मोठे व्हा या तत्त्वाने काम करीत आहे .तळागाळातील शेतकरी, शेतमजूर, माथाडी कामगार ,रिक्षाचालक



,भाजी विक्रेत्यांची मुले सर्वाधिक करून या विद्यालयात शिक्षण घेऊन आपले आयुष्य घडवत आहेत. या विद्या संकुलात मराठी, इंग्रजी ,हिंदी ,उर्दू या चार भाषांतून शिक्षण दिले जाते .विद्यालयात सर्वांना मुक्त प्रवेश दिला जातो. दहावीच्या परीक्षेत विद्यालयातील इंग्रजी मराठी व हिंदी माध्यमातून दहावीच्या विद्यार्थ्यांनी चांगले गुण प्राप्त करून विद्यालयाचे नाव शैक्षणिक पातळीवर चमकले आहे .याच विद्यालयात मराठी माध्यम मध्ये शिकणाऱ्या वैभव दिलीप चव्हाण या विद्यार्थ्याने कुटुंबाची परिस्थिती बेताची असताना आणि वडील आपले रिक्षाचालक असल्याची जाणीव मनात उराशी बाळगून मेहनतीच्या जोरावर त्यांनी बारावीच्या परीक्षेत 87 टक्के गुण मिळवून सुधागड विद्या संकुलात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. वैभवने दहावीच्या परीक्षेमध्ये सुद्धा 95 टक्के गुण प्राप्त करून विद्या संकुलात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला होता.वैभव चव्हाण चे कुटुंब हे सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील गुरसाळे तालुक्यातील ग्रामीण भागातील आहेत .उदरनिर्वाहासाठी ते कळंबोलीत येऊन रिक्षा चालवण्याचा व्यवसाय करीत आहेत. वैभव ची आई गृहिणी असून तिच्या संस्काराने वैभवने हे चांगले गुण प्राप्त केले आहेत. आई-वडिलांच्या कष्टाचे चीज करून शैक्षणिक भरारी घेणाऱ्या वैभव चव्हाण चे व अन्य माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांचे शिक्षकांकडून तसेच समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे . वैभवने मेहनत करून परिस्थितीवर मात करून शैक्षणिक भरारी घेतल्याने त्याच्या गुरसाळे गावांमध्येही ग्रामस्थांनी जल्लोष व आनंदोत्सव साजरा केला आहे. त्याच्या आजी आजोबा व काकांनी व ग्रामस्थांनी त्यांचे पेढे भरून कौतुक व शाबासकीची थाप दिली आहे. विद्यालयातील त्याचे शिक्षक मनीषा गायकवाड व जितेंद्र पवार यांनी त्याच्या गुणवत्तेकडे अधिक लक्ष दिल्याचे यावेळी सांगण्यात आले.सुधागड विद्या संकुलाचा सर्व माध्यमाचा सरासरी निकाल हा ९५ % पेक्षाही जास्त आहे. अवाढव्य विद्यार्थी संख्या असूनही विद्यार्थी केंद्रित शिक्षण या विद्यालयातून दिले जात असून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल याकडे शिक्षक ,संस्था व शाळा लक्ष देत आहे. दहावी आणि तसेच बारावीच्या परीक्षेतही प्रथम मिळण्याचा बहुमान पटकावणारा वैभव चव्हाण यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे.सजग आणि चाणक्य विद्यार्थी घडवण्याचे काम विद्या संकुल कडून केले जात असल्याचे विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी सांगितले आहे.

## पाटोद्यात आडत व्यापाऱ्याकडून शेतकऱ्याची लाखो रुपयांची लुट? शेतमाल घेऊन व्यापारी फरार!

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** कष्टाने पिकवलेला शेतीमाल विश्वासाने व्यापाऱ्याच्या पदरात टाकला मात्र तोच विश्वास आता शेतकऱ्यांच्या मुळावर उठला आहे. पाटोदा येथील एका प्रसिद्ध आडत व्यापाऱ्याने पाटोदा परिसरातील अनेक गावांतील शेतकऱ्यांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून संबंधित व्यापारी दुकान बंद करून कुटुंबासह पसार झाला असून या प्रकरणी संतप्त शेतकऱ्यांनी पाटोदा पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली आहे. पाटोदा शहरातील 'जयमल्हार ट्रेडिंग कंपनी' चे मालक संदीप रामराव नवले रा.शिखरवाडी,ता.पाटोदा हे गेल्या ८ ते ९ वर्षांपासून या भागात शेतीमाल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करत होते. अनेक वर्षांपासूनचा परिचय आणि व्यवहार चोख असल्याने परिसरातील नफरवाडी, नागेशवाडी, बेलेवाडी, वाघिरा, वैजाळा या सह अनेक गावांतील शेतकऱ्यांचा त्यांच्या वर मोठा विश्वास होता. याच विश्वासापोटी शेतकऱ्यांनी आपला सोयाबीन, हरभरा व इतर शेतीमाल मोठ्या प्रमाणात नवले यांच्या कडे विक्रीसाठी दिला होता. माल खरेदी करताना व्यापाऱ्याने १० ते १५ दिवसांत किंवा जास्तीत जास्त महिन्याभरात तुमचे पैसे मिळतील असे आश्वासन दिले होते. व्यवहाराचा पुरावा म्हणून शेतकऱ्यांना अधिकृत पावत्याही देण्यात आल्या होत्या. महिना उलटून गेला तरी दिलेला शब्द पाळण्याऐवजी महिना उलटून गेल्यानंतरही व्यापाऱ्याने कोणाचेही पैसे दिले नाहीत. शेतकरी जेव्हा आपल्या हक्काचे पैसे मागण्यासाठी पाटोद्यातील दुकानावर गेले



तेव्हा त्यांना दुकान बंद असल्याचे आढळून आले. शेजारील दुकानदारांकडे चौकशी केली असता हे दुकान गेल्या महिनाभरापासून उघडलेच नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली. व्यापारी गायब झाल्याचे लक्षात येताच हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी संदीप नवले यांचे मूळ गाव शिखरवाडी येथे धाव घेतली. तिथे त्याच्या कुटुंबाकडे चौकशी केली असता कुटुंबीयांनीही ते कुठे आहे या बाबत आपल्याला काहीच माहिती नसल्याचे सांगत हात वर केले. त्या मुळे आपली फसवणूक झाल्याची खात्री पटताच शेतकऱ्यांच्या पायाखालची जमीन सरकली. या नंतर नफरवाडी, नागेशवाडी, बेलेवाडी आणि वाघिरा परिसरातील मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी पाटोदा पोलीस ठाणे गाठले. शेतकऱ्यांनी पोलिसांना लेखी निवेदन देऊन आपबिती सांगितली. या फसवणुकीचा आकडा मोठा असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आम्ही घाम गाळून पीक पिकवले, मुलांची लग्ने, शिक्षण आणि कर्जाचे हप्ते फेडण्यासाठी हा पैसा गरजेचा होता. संबंधित आडत व्यापाऱ्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून त्याला अटक करावी आणि आमचे हक्काचे पैसे व्याजासह परत मिळवून द्यावेत अशी आर्त हाक शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिली आहे. या घटनेमुळे संपूर्ण पाटोदा तालुक्यात खळबळ उडाली असून व्यापाऱ्यांच्या विश्वासार्हतेवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. आता पोलीस या प्रकरणात काय कारवाई करतात या कडे संबंधित शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. या वेळी उत्तरेश्वर हरिभाऊ औटे, बळीराम भानुदास तांबे, शिवाजी भानुदास तांबे, ज्ञानदेव रघुनाथ मंडलीक, धर्मेंद्र हरिभाऊ औटे, दत्ता हरिभाऊ औटे, बबन भगवान औटे, अर्जुन श्रीधर मंडलीक, तुकाराम लक्ष्मण तांबे, गणेश बबन ढेरे, विश्वंभर गहिनीनाथ मंडलीक, सुशेन दादासाहेब ढेरे, संतोष तुकाराम मुळीक, संदिप दादासाहेब नलवडे, विष्णु शाहुराव शिंदे, रावसाहेब कारभारी गर्जे, सिताराम प्रल्हाद पन्हाळकर, दिनकर गणपती मुळीक, गोकुळ पांडुरंग ढास, रमेश धर्मा जोगदंड, उमेश राजेभाऊ कदम, अंगद माणिक येडे, तुषार नारायण ढेरे, बबन नारायण येडे, दगडु भगवान मंडलीक, शरद वलभिम हेरे, जाधव प्रदिप नवनाथ सह इतर शेतकरी बांधव उपस्थित होते.

# अल्पवयीन आदिवासी मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न; कारंजा संतापाने पेटले – आरोपीला तात्काळ अटक करा, अन्यथा तीव्र आंदोलन!

## खेर्डा जिरापुरे येथील धक्कादायक प्रकार; POCSO व ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत कठोर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : कारंजा (वाशिम) तालुक्यातील खेर्डा जिरापुरे येथे 14 वर्षीय आदिवासी (गोंड) अल्पवयीन मुलीवर छेडछाड व अत्याचाराच्या प्रयत्नाची अत्यंत गंभीर घटना उघडकीस आल्याने संपूर्ण परिसरात संतापाची तीव्र लाट उसळली आहे. आरोपीला तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांसह विविध सामाजिक संघटनांकडून जोर धरत आहे.

पीडित मुलीने कारंजा शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या जबानीनुसार, गावातील मनीष विष्णुपंत गुल्लाने (वय 55, व्यवसाय – शेती) याने तिच्याशी अयोग्य वर्तन करत जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर तिला धमकावल्याचेही समोर आले आहे. मुलगी इयत्ता 9 वीमध्ये शिक्षण घेत असून तिचे आई-वडील मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. आरोपी हा घरच्यांचा ओळखीचा असल्याने त्याने विश्वासाचा गैरफायदा घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

माहितीनुसार, दि. 23 एप्रिल रोजी कारंजा बाजारात आरोपीने मुलीशी अयोग्य संवाद साधण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळी घाबरलेल्या मुलीने ही बाब घरी सांगितली नव्हती. मात्र दि. 2 मे रोजी



सकाळी ती घरी एकटी असताना आरोपी घरात घुसला, दार बंद करून तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. मुलीने प्रसंगावधान राखत जोरदार प्रतिकार करून स्वतःची सुटका केली. त्यानंतर आरोपीने तिला पैसे देऊन गप्प बसवण्याचा प्रयत्न केला आणि जीव मारण्याची धमकी दिल्याचेही उघड झाले आहे.

घटनेनंतर मुलीने प्रथम आपल्या आत्याला आणि नंतर आई-वडिलांना संपूर्ण प्रकार सांगितला. त्यानंतर कारंजा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संताप व्यक्त होत असून न्यायासाठी नागरिक पुढे सरसावले आहेत.

**तात्काळ अटकेची मागणी; आंदोलनाचा इशारा**

अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदचे राज्य प्रभारी अविनाश भाऊ पंधरे यांनी घटनेचा तीव्र निषेध करत आरोपीला तात्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. "कारवाईत विलंब झाल्यास मोठ्या प्रमाणावर आंदोलन उभारले जाईल," असा इशारा त्यांनी दिला.

सामाजिक कार्यकर्ते सुजित भगत यांनी प्रशासनावर टीका करत सांगितले की, "एससी-एसटी समाज व महिलांवरील वाढते अत्याचार ही गंभीर बाब असून प्रशासनाने तातडीने कठोर भूमिका घ्यावी." त्यांनी आरोपीविरुद्ध POCSO व ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत त्वरित गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी केली आहे.

**नागरिकांचा मोठा जमाव; न्यायासाठी ठाम भूमिका**

या प्रकरणी पोलीस ठाण्यात मोठ्या संख्येने आदिवासी बांधव व महिला उपस्थित राहून पीडितेला न्याय मिळावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. यावेळी प्रमोद देवळे, गजानन वरगट, भीमराव भलावी, दत्ता चिकराम, विनोद एडापाटे, दिनेश मसराम, सागर सेडमाके, ऋषभ कुमरे, गोलू वाधवे, शालिग्राम मरसकोले, निखिल पेंदाम, कार्तिक तुमडाम, अंकुश तुमडाम, गजानन सयाम, गणेश शिडाम, संतोष चौधरी, रघुनाथ सिडाम आदी उपस्थित होते.

**पोलीस तपास सुरू; पुढील कारवाईकडे लक्ष**

दरम्यान, पोलीसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली असून आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल, असे संकेत दिले आहेत. मात्र वाढता जनदबाव लक्षात घेता पुढील कारवाईकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# पावसाळ्यापूर्वी सर्वंकष तयारीला वेग
## पनवेल महानगरपालिकेची विविध विभागांसोबत बैठक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य आपत्कालीन परिस्थिती टाळण्यासाठी पनवेल महानगरपालिकेकडून व्यापक नियोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात आयोजित नियोजन बैठक आज आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यालयात घेण्यात आली. यावेळी विविध विभागांना तत्काळ उपाययोजना राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. सर्व विभागांमध्ये समन्वय राखून कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, पोलिस उपायुक्त तिरूपती काकडे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे,



शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी , उपअभियंता विलास चव्हाण, चारही प्रभागाचे प्रभाग अधिकारी ,वृक्ष प्राधिकरण विभाग प्रमुख संदिप पवार, पोलिस विभागाचे चारही प्रभागातील वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाहतूक पोलिस, पालिका अधिकारी, सिडको अधिकारी, आयआरबी प्रतिनिधी, उपस्थित होते.

पूरस्थिती उद्भवल्यास गाढी नदी परिसरातील नागरिकांसाठी तात्पुरते निवारा (ट्रान्झिट कॅम्प) उभारण्याची तयारी करणे व त्या अनुषंगाने सर्व तयारी करण्याचे आदेश देण्यात आले आहे. तसेच शहरातील सर्व नाले वेळेत साफ करण्याच्या सूचना संबधित विभागाला देण्यात आले.महापालिका क्षेत्रातील पाणी साचणाऱ्या ठिकाणांची आढावा घेऊन तेथे त्वरित उपाययोजना करण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले. फायर ब्रिगेड यंत्रणा सज्ज ठेवण्याबरोबरच,धोकादायक इमारती रिकाम्या करण्याच्यादृष्टीने सिडको,एमएसीबी यांनी सहकार्य करण्याच्या सूचना या बैठकित देण्यात आल्या.

तसेच धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करून त्याची माहिती पोलिस विभागाला देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# सिल्लोडमध्ये भाजपचा 'विजयोत्सव'; तीन राज्यांतील यशाने कार्यकर्ते उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर/योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : पश्चिम बंगाल, आसाम व पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी व एनडीए (NDA) आघाडीला माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात मिळालेल्या भरघोस यशाबद्दल आज सिल्लोड येथे जल्लोष करण्यात आला. येथील भाजप कार्यालयासमोर फटाक्यांची प्रचंड आतषबाजी आणि मिठाई वाटप करून कार्यकर्त्यांनी आपला आनंद व्यक्त केला.

या विजयोत्सवाप्रसंगी सिल्लोड-सोयगाव विधानसभा नेते सुरेश बनकर, भाजप किसान मोर्चा प्रदेश सरचिटणीस मकरंद कोरडे, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ज्ञानेश्वर पाटील मोठे, शहराध्यक्ष मनोज मोरल्लू, भवन मंडळाध्यक्ष एकनाथ हिवाळे, नगरसेवक स्वप्निल



शिनगारे, शामराव आळणे, विजय वानखेडे, पंचायत समिती सदस्य गजानन जाधव, चेअरमन अशोक साखळे, राजेंद्र दांडगे, सुभाष जेठर, विष्णू बदर , मधुकर जाधव, निखिल गवळी, अमोल कुलकर्णी, अरुण राठोड, ऋषिंदर शिंदे, अमोल कारले, जगदीश कवाल, योगेश साळवे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# युवा सेनेची बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी पनवेलमध्ये बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : युवासेना सचिव तथा मावळ लोकसभा युवासेना संपर्कप्रमुख, गटनेते, नगरसेवक, पिंपरी चिंचवड महापालिका विश्वजीत श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली तर पनवेल शिवसेनेचे महानगरप्रमुख नगरसेवक प्रथमेश सोमण तथा उपजिल्हाप्रमुख परेशभाई पाटील यांच्या नेतृत्वात एस. आय. आर. संबंधी बी. एल. ए. नेमणुका व इतर संघटनात्मक विषयांवर प्रमुख पदाधिकाऱ्यांची पनवेल मध्ये यशस्वी बैठक संपन्न झाली.

या बैठकीस विधानसभेचे संपर्कप्रमुख राजेंद्र यादव, युवा सेना लोकसभा अध्यक्ष पराग मोहिते, विधानसभा प्रमुख नितीन काळे, महिला तालुकाप्रमुख मंदाताई जंगले, उपमहानगरप्रमुख सचिन मोरे, महेश सावंत, उपतालुकाप्रमुख जगदीश ठाकुर, महानगर समन्वयक डी एन मिश्रा, उपविधानसभाप्रमुख डॉक्टर प्रशांत कदम, खारघर शहर प्रमुख प्रसाद परब, नवीन पनवेल शहर प्रमुख अतुल मोकल, उपमहा नगर समन्वयक राहुल गोगटे, सुजन मुसलोन्डकर, पनवेल शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, उपतालुकाप्रमुख राकेश भोईर, विश्वास पाटील, कैलास माळी, दिनेश मांडवकर, तळोजे शहर संघटक राहुल कदम, तळोजे एमआयडीसी प्रमुख प्रकाश म्हात्रे, उपतालुका संघटक नरेश नरसिंगे, कळंबोली महिला शहरप्रमुख ज्योतीताई पाटील, नवीन



पनवेल महिला शहर प्रमुख माया देवडे, पनवेल शहर प्रमुख प्रीती खानविलकर, शहर संघटिका अर्चना जाधव, खारघरच्या सौ भाग्यश्री कदम, विभागप्रमुख नयना सुरते, उपतालुकाप्रमुख स्मिता भोईर, पूर्णा पाटील, शिवसेनेच्या शीख सेलचे नरेंद्रसिंग होटी, पनवेल शहर संघटक अभिजीत साखरे, पनवेल उपशहर प्रमुख शैलेश जगनाडे, प्रसिद्धी प्रमुख तौपिक बागवान, किरण पवार, यासह पनवेल शहरातील प्रमुख पदाधिकारी युवा सेनेचे प्रमुख पदाधिकारी व युवासैनिक तथा महिला आघाडीच्या पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या बैठकीत आत्तापर्यंत नेमणूक करण्यात आलेल्या बी.एल.ए. 2 याचा आढावा घेतला गेला तर उर्वरित बी.एल.ए यांची नियुक्ती करून त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्याच्या सूचना विश्वजीत बारणे यांनी केली. तर संघटनात्मक अंतर्गत बदलांचे ही संकेत विश्वजीत बारणे यांच्यातर्फे देण्यात आले.

# जोगेश्वरी स्टेशन परिसरातील फुटपाथ अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांचा जीव धोक्यात

## प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिक त्रस्त; तातडीने कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर/मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : जोगेश्वरी (पूर्व) रेल्वे स्थानकाबाहेरील मुख्य प्रवेशद्वार परिसरात फुटपाथवर वाढलेल्या अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांची मोठी गैरसोय होत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. स्टेशन परिसरातील पदपथांवर अनधिकृत मोबाइल दुरुस्ती स्टॉल्स, फेरीवाले तसेच लहान-मोठी दुकाने उभारण्यात आल्याने पादचाऱ्यांना चालण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

दररोज हजारो प्रवासी जोगेश्वरी रेल्वे स्थानकातून प्रवास करत असतात. सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळेत परिस्थिती अधिक बिकट होत असून नागरिकांना थेट रस्त्यावरून चालत प्रवास करावा लागत आहे. यामुळे वाहनांच्या सततच्या वर्दळीमध्ये अपघात होण्याचा धोका वाढला आहे.



विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती आणि शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

स्थानिक रहिवाशांच्या मते, फुटपाथवरील अतिक्रमण दिवसेंदिवस वाढत असून प्रशासनाकडून वेळोवेळी कारवाई केली जात असली तरी काही दिवसांत पुन्हा त्याच ठिकाणी दुकाने उभी राहत आहेत. अनेक विक्रेत्यांनी वीजजोडणी, फलक आणि कायमस्वरूपी संरचना उभारल्याचेही दिसून येत आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ तात्पुरत्या फेरीवाल्यांपुरता मर्यादित नसून संघटित अतिक्रमणाचे स्वरूप धारण करत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

नियमांनुसार Brihanmumbai Municipal Corporation (BMC) कडून फुटपाथ पादचाऱ्यांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. तसेच, फेरीवाल्यांना अधिकृत हॉकर झोनमध्येच व्यवसाय करण्यास परवानगी दिली जाते. मात्र प्रत्यक्षात स्टेशन परिसरातील अनेक ठिकाणी या नियमांचे उघड उल्लंघन होत असल्याचे दिसत आहे. काही ठिकाणी दुकाने थेट पदपथावर उभारण्यात आली असून नागरिकांना रस्त्यावरून मार्ग काढावा लागत आहे. स्थानिक नागरिकांनी अनेकदा BMC, रेल्वे प्रशासन तसेच मुंबई वाहतूक पोलिसांकडे तक्रारी केल्याचे सांगितले. मात्र अद्याप ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. "फुटपाथ पादचाऱ्यांसाठी की अतिक्रमणासाठी?" असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

वाहतूक तज्ज्ञांच्या मते, रेल्वे स्थानक परिसर हा अत्यंत संवेदनशील भाग मानला जातो. अशा ठिकाणी अतिक्रमण वाढल्यास केवळ वाहतूक कोंडीच नव्हे तर आपत्कालीन परिस्थितीत बचावकार्यालाही अडथळा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संबंधित विभागांनी संयुक्त मोहीम राबवून कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.दरम्यान, नागरिकांनी प्रशासनाने तातडीने कारवाई करून फुटपाथ मोकळे करावेत, अनधिकृत स्टॉल्स हटवावेत आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, अशी जोरदार मागणी केली आहे.

# आता घडणार विद्यार्थ्यांचे खरं भविष्य !

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास तसेच भविष्याची पूर्वतयारी या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग लाखनी भविष्य Summer ट्रेनिंग 2.0 ( उन्हाळी प्रशिक्षण ) या नावाने 30 दिवसीय विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे. या उन्हाळी प्रशिक्षणाचा मुख्य हेतू म्हणजे विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी तसेच त्यांच्या भविष्यामध्ये लागणाऱ्या प्रत्येक बाबींसाठी त्यांना लागणाऱ्या उत्कृष्ट दर्जाचे ज्ञान देणे आहे.

या उन्हाळी प्रशिक्षणात वेगवेगळ्या संस्थांनी आपले मोलाचे योगदान दिले आहे. या उन्हाळी प्रशिक्षणामध्ये मुख्य पाच प्रशिक्षण दिले जाणार आहेत. १) स्पर्धा परीक्षा बेसिक फाउंडेशन २) MPSC - UPSC बेसिक फाउंडेशन ३) आर्टिफिशियल इंटेलिजन्स तसेच वर्तमान टेक्नॉलॉजी ४) इंग्लिश स्पीकिंग ट्रेनिंग ५) जापनीस स्पिकिंग ट्रेनिंग असे आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग चे संचालक श्री निहाल वालदे सरांनी सांगितले. गावा खेड्यातील तसेच तळागाळातील गोरगरिबांना भविष्यामध्ये अति आवश्यक असणारे ज्ञान या प्रशिक्षणातून देण्याचा उद्देश श्री निहाल वालदे सरांचा आहे. तर प्रत्येकाने या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा आणि या प्रशिक्षणांमध्ये सहभागी व्हावं. अधिक माहितीसाठी संपर्क ८७८८६७०१४१





सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# देवणी नगरपंचायतीत गाळे वाटप घोटाळ्याचा आरोप

## चौदा वर्षांच्या भाडे व्यवहारांची चौकशीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देवणी नगरपंचायत मालकीच्या उदगीर–निलंगा मुख्य रस्त्यालगत असलेल्या दुकान गाळ्यांच्या वाटप व भाडे वसुलीत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप पुढे आला असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी तक्रार अलीमोदीन शेख राहणार देवणी यांनी संबंधित नगरी विकास विभागाकडे केली आहे .




तक्रारीनुसार, सन 2011 ते 2025 या कालावधीत सुमारे 17 गाळे नियमाप्रमाणे जाहीर लिलाव न करता ठराविक व्यक्तींना देण्यात आले. एका मोटरसायकल शोरूमसाठी चार गाळे, तर गॅस एजन्सीसाठी दोन गाळे दुकाने देण्यात आल्याचा तक्रारीत नमूद केले असून तसेच भाडे वसुलीची अधिकृत नोंद अद्ययावत ठेवण्यात आलेली नसून, लाखो रुपयांचे भाडे अनधिकृतरीत्या वसूल होऊन त्याचा अपहार होत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून कोणता राजकीय पुढारी नगरपंचायत कर्मचारी यांना हाताशी धरून भाडे रकमेचा दुरुपयोग केल्याची चौकशी करून कारवाई करावी. अशी मागणी पुढे आली.याशिवाय, खाजगी उर्दू शाळेला सुमारे 25 गाळे ताब्यात देणे व शहरातील जुन्या भाजी मार्केटमधील दुकानांमधूनही अनधिकृत वसुली होत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. माहिती विचारल्यानंतर संबंधितांकडून समाधानकारक उत्तरे न मिळाल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

ही तक्रार छत्रपती संभाजीनगर नगर विकास विभाग आयुक्त कार्यालय आणि लातूर जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे सादर करण्यात आली असून, दरम्यान, महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगर अधिनियम 1965 नुसार गाळे वाटप व भाडे वसुलीत पारदर्शकता, जाहीर लिलाव व नोंदवही ठेवणे बंधनकारक आहे. या नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाईची तरतूद आहे.या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होऊन वास्तव समोर येईल का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अजिंठा लेणी परिसराचा जागतिक स्तरावर कायापालट होणार : शंभूराज देसाई

## आ. अब्दुल सत्तार यांच्या पाठपुराव्याला यश; ७०० एकरचा विकास अन् निधीचे मंत्र्यांचे निर्देश

**दैनिक युवक आधार छत्रपती संभाजीनगर**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : जागतिक वारसा लाभलेल्या अजिंठा लेणी परिसराचा नियोजनबद्ध व सर्वांगीण विकास करण्यासाठी सुमारे ७०० एकर आरक्षित क्षेत्राचा कायापालट करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. राज्याचे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या मुंबई येथील 'मेघदूत' या शासकीय निवासस्थानी मंगळवारी (दि. ५) झालेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत आमदार अब्दुल सत्तार यांनी मतदारसंघातील पर्यटन प्रकल्पांबाबत मांडलेल्या प्रस्तावांना तातडीने गती देण्याचे निर्देश मंत्र्यांनी दिले.



या महत्त्वपूर्ण बैठकीस पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, पर्यटन संचालनालयाचे संचालक मंगेश जोशी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटने, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सुंदरलाल भगत, अधीक्षक अभियंता संजय पाटील, कार्यकारी अभियंता शेषराव चव्हाण आणि अजिंठा लेणी दुकानदार संघटनेचे अध्यक्ष पर्पीद्रसिंग पाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत आमदार अब्दुल सत्तार यांनी अजिंठा लेणी आणि 'व्ह्यू पॉईंट' परिसरात स्थानिकांना शाश्वत रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी अत्याधुनिक व्यापार संकुल उभारण्याची आग्रही मागणी केली. यावर सकारात्मक निर्णय घेत, ७०० एकर क्षेत्राच्या टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी संदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच ठाणा फर्दापूर येथील क्रांतीसूर्य संत सेवालाल महाराज स्मारकासाठी १५ कोटी रुपयांचा निधी व ५ एकर जागा उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी व सोयीसाठी स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी आणि मधमाशांच्या पोळ्यांचे सुरक्षित व्यवस्थापन करण्याच्या सूचनाही मंत्री देसाई यांनी यावेळी प्रशासनाला दिल्या.

अजिंठा विकासाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लोकप्रतिनिधी, स्थानिक प्रशासन व पर्यटन विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेली 'सल्लागार समिती' स्थापन करण्याचे आदेश मंत्र्यांनी दिले. ही समिती प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून पुढील कार्यवाहीचा मार्ग मोकळा करणार आहे. यासोबतच जंजाळा किल्ला संवर्धन, शिव स्मारक व भीम पार्क प्रकल्पांच्या प्रगतीचाही आढावा घेण्यात आला.

मतदारसंघातील पर्यटन विकासाबाबत शासनाची भूमिका पूर्णपणे सकारात्मक असल्याचे मंत्री शंभूराज देसाई यांनी यावेळी स्पष्ट केले.

# नवोदित आदिवासी साहित्य परिषदेत मधुसूदन कोवे गुरुजी लिखित "कर्मयोग" पुस्तकाचे प्रकाशन; 'समाज रत्न पुरस्काराने' गौरव

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : यवतमाळ येथे आयोजित नवोदित आदिवासी साहित्य परिषदेत सामाजिक कार्यकर्ते तथा ग्राम स्वराज्य महामंचचे अध्यक्ष मधुसूदन कोवे गुरुजी लिखित "कर्मयोग" तसेच "आयुष्याच्या पलीकडे असलेलं आयुष्य" या पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी समाजकार्य, साहित्य आणि वैचारिक योगदानाची दखल घेत कोवे गुरुजी यांना "समाज रत्न पुरस्कार" प्रदान करून गौरविण्यात आले.



या परिषदेला अध्यक्ष म्हणून पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. तुकाराम रोंगटे उपस्थित होते. प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रा. संजय लोहकरे, डॉ. चिंतामण धिंदळे (पनवेल), ज्येष्ठ साहित्यिक बाबाराव मडावी, प्रा. संगीता मसराम, डॉ. विलास कनाके तसेच गट शिक्षणाधिकारी राजू मडावी उपस्थित होते.

परिषदेचे स्वागताध्यक्ष प्रा. वसंत कनाके (हुंकार आदिवासीचा) यांनी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. आदिवासी समाजात वैचारिक मंथन, प्रबोधन, सांस्कृतिक जतन आणि साहित्यिक मार्गदर्शन व्हावे या उद्देशाने आयोजित परिषदेत समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रमाणपत्र व पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

मधुसूदन कोवे गुरुजी यांच्या सामाजिक, वैचारिक आणि साहित्यिक योगदानाची दखल घेत त्यांना "समाज रत्न पुरस्कार" प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर त्यांच्या "कर्मयोग" या पुस्तकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वतः मधुसूदन कोवे गुरुजी यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. नितीन टेकाम (पांढरकवडा) यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी कवी संमेलनाने परिषदेची सांगता करण्यात आली.

# भरधाव एसटी बसच्या साईड डिकी दरवाज्याची धडक;

## तिघेजण जखमी, चालकाच्या मद्यप्राशनाबाबत संशय

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी /अनिकेत मोहित** : श्रीवर्धन आगारातून मुंबईकडे निघालेल्या भरधाव एसटी क्रमांक (एमएच 09 एफएल 0167) बसच्या साईड डिकी दरवाज्याची धडक बसून तीन पादचारी जखमी झाल्याची गंभीर घटना मंगळवारी सायंकाळी बागमांडले येथे घडली. या अपघातात दोन महिला व एक पुरुष गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर बस सायंकाळी सुमारे ७ वाजता श्रीवर्धन येथून मुंबईकडे रवाना झाली होती. सुमारे ७.३० वाजण्याच्या सुमारास बागमांडले येथे रस्त्याने चालत असलेल्या पादचाऱ्यांना बसच्या साईड डिकी दरवाज्याने जोरदार धडक दिली. धडक इतकी तीव्र होती की तिघेही गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर जखमींना तातडीने बागमांडले येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारांनंतर त्यांना पुढील उपचारासाठी श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. तसेच एसटी आगार प्रमुखांनी रुग्णालयात भेट देऊन जखमींची विचारपूस केली. यावेळी स्थानिक नागरिकांनी जखमींच्या उपचाराचा संपूर्ण खर्च एसटी प्रशासनाने उचलावा, अशी मागणी केली आहे

दरम्यान, काही नागरिकांनी अपघातावेळी बस चालक व वाहक मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत असल्याचा संशय व्यक्त केला आहे. तसेच अपघाताची तीव्रता लक्षात घेता काही जखमींच्या शरीराला बसच्या पत्र्याचा स्पर्श होऊन जखमा झाल्याचेही सांगितले जात आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.

# भंडाऱ्यातील प्रस्तावित मेडिकल कॉलेजला डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्या – जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे भंडारा** - भंडारा जिल्ह्यात पलाडी येथे उभारण्यात येणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी आझाद समाज पार्टी (कांशीराम)भंडारा जिल्हा च्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले की, डॉ. आंबेडकरांचे भंडारा जिल्ह्याशी ऐतिहासिक संबंध असून समाज आणि देशाच्या उभारणीत त्यांचे योगदान अतुलनीय आहे. तसेच नागरिकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, अंधश्रद्धा दूर व्हावी आणि लोकांनी योग्य वैद्यकीय उपचार घ्यावेत, यासाठी राज्यघटनेतील कलम ५१ (अ) (ह) महत्त्वाचे आहे.या पार्श्वभूमीवर नव्या मेडिकल कॉलेजला त्यांचे नाव देणे हे योग्य आणि सन्मानजनक ठरेल, असे निवेदनात म्हटले आहे.




# कृषी यांत्रिकीकरण योजनेत बी.बी.एफ. पेरणी यंत्रासाठी अर्ज करावा !! अधिक्षक कृषी अधिकाऱ्यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : अल-निनो च्या पार्श्वभूमीवर खरीप हंगाम २०२६ मध्ये सोयाबीन, तूर, मुंग व उडीद पिकाच्या पेरणीत सुलभता आणण्यासाठी, बियाण्याची बचत व उत्पादन वाढ करण्याच्या हेतूने बी.बी. एफ. पेरणी यंत्र यांचा कृषी यांत्रिकीकरण अभियानातंर्गत समावेश करण्यात आला आहे.



वैयक्तिक शेतकरी किंवा शेतकरी गट हे याबाबिच्या अनुदानासाठी पात्र राहतील. बी.बी.एफ.पेरणी यंत्र (ट्रॅक्टर ३५ बी.एच.पी. वरील) खरेदीसाठी अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती /महिला/अल्प/अत्यल्प शेतकरी यांना ५५ हजार रुपये प्रति यंत्र किंवा किमतीच्या ५० टक्के या पैकी जे कमी असेल ते व सर्वसाधारण/मोठे शेतकरी यांना ४४ हजार रुपये प्रति यंत्र किंवा किमतीच्या ४० टक्के या पैकी जे कमी असेल ते याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. याबाबीची अंमलबजावणी कृषी यांत्रिकीकरण उपभियान (SMAM) मार्गदर्शक सूचनांनुसार करावी.

यासाठी उपरोल्लेखित केल्याप्रमाणे महाडीबीटी प्रणालीवर या बाबीच्या लाभासाठी (https://mahadbtmahait.gov.in) या वेबसाईटवर जाऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी अर्ज करावे असे आवाहन डॉ. मुरली इंगळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला यांनी केले आहे व अधिक माहितीकरिता कृषि विभागाच्या सहायक कृषी अधिकारी, उप कृषि अधिकारी व मंडळ कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

# महाराष्ट्र सुवर्ण रत्न पुरस्काराने' पत्रकार गजानन बानोरे सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनीधी. रणजितसिह. ठाकूर.** : महाराष्ट्र सुवर्णकार संस्थेचा 'रजत महोत्सव' व सुवर्णालंकाराच्या तीन दशकापूर्ती सोहळयानिमित्त सर्व शाकीय राज्यस्तरीय सोनार महोत्सव राज्यस्तरीय महिला मेळावा २०२६ चे आयोजन ३ मे रोजी नागपूर येथील रेशीम बाग मधील कविवर्य सुरेश भट सभागृहात करण्यात आले होते.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र सुवर्णकार संस्था नागपूर चे पुरुषोत्तमजी कावळे हे होते तर स्वागताध्यक्ष राजेशजी रोकडे, विशेष अतिथी गृहराज्यमंत्री मा. पंकजाची भोयर, महापौर नीताताई ठाकरे, खासदार राजेशजी वर्मा, सुवर्णलंकार मासिकचे मुख्य संपादक प्रकाश माथने, राष्ट्रीय अध्यक्ष जितेंद्र वर्मा, आमदार कृष्णा भाऊ खोपडे, आमदार मोहनजी मते, आमदार प्रवीणजी दटके, माजी आमदार सुधाकर कोहळे, मध्यप्रदेश सराफा असोशिएशनचे अध्यक्ष राजा सराफ, भारतीय सुवर्णलंकार संघ दुलीचंदजी कडेल यांच्यासह अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होते.

या मेळाव्यामध्ये सर्व मान्यवरांनी सोनार समाजातील सर्व शाखांनी एकत्र येऊन सोनार समाजाला विकासात्मक प्रवाहात आणण्याची आवाहन केले तसेच शाखा भेद न पळता मुला-मुलींचे विवाह पार पाडणे, सोनार व्यवसायातील अडचणी कशा प्रकारे सोडविता येतील यासह अनेक विषयावर व्यासपिठावरील मान्यवरांनी आपले मनोगत या प्रसंगी व्यक्त केले. सोनार समाजातील प्रतिभान व्यक्तीचा तसेच नवनिर्वात सोनार समाजातील नगरसेवक, नगरसेविका, सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तीचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व शिल्ड देऊन सन्मान करण्यात आला.

पत्रकारीता क्षेत्रात गेल्या ३५ वर्षापासून कार्यरत असलेले व सामाजिक कार्यात नेहमी सहभागी होणारे पत्रकार गजानन बानोरे यांचा व्यसपिठावरील मान्यवरांच्या हस्ते 'महाराष्ट्र सुवर्ण रत्न पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

# भारत कन्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची उत्कृष्ट,उज्वल, दैदीप्यमान निकालाची परंपरा कायम

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी. रणजितसिह. ठाकूर** : रिसोड तालुक्यातील एकमेव नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणारी भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या एच.एस.सी बोर्ड परीक्षा मार्च 2025-26 मध्ये अमरावती विभागातून याही वर्षी उज्वल उत्कृष्ट दैदिप्यमान निकालाची परंपरा कायम ठेवली. भारत कन्या कनिष्ठ महाविद्यालयाचा एकूण निकाल 92.80% लागला असून. त्यामध्ये वाणिज्य शाखेचा निकाल 100%टक्के लगला आसुन. रिसोड तालुक्यातून वाणिज्य शाखेचा शंभर टक्के निकाल देणारे भारत कन्या कनिष्ठ हे एकमेव महाविद्यालय आहे. त्यामध्ये प्रथम येणारी विद्यार्थिनी कु. भूमिका शिवाजी चतरकर 83.67%. द्वितीय कु.अंकिता बद्रीनाथ वाळके 73.50%. तृतीय भक्ती एकनाथ मेनकर 73.00%. तर विज्ञान


भारत माध्यमिक कन्या शाळा, रिसोड
एच.एस.सी.परिक्षा फेब्रुवारी/मार्च-२०२५-२०२६
एकुण सरासरी निकाल – 92.80%

वाणिज्य शाखा (100%)

कु.भुमिका शिवाजी चतरकर प्रथम - 83.67%
कु.अंकिता बद्रीनारायण वाळके द्वितीय -73.50%
कु.भक्ती एकनाथ मेनकर तृतीय -73.00%

विज्ञान शाखा (95.72%)

कु.दिव्या लक्ष्मण सरोदे प्रथम . 75.33%
कु.सिध्दी गोविंदराव तायडे द्वितीय .75.00%
कु.पुनम गणेश भांदुर्गे तृतीय .73.67%

कला शाखा (83.33%)

कु.सनाबी हमीदखाँ पठाण प्रथम . 72.83%
कु.अनन्या गणेश वाठोरे द्वितीय .66.67%
कु.सलोनी सिध्दार्थ मोरे तृतीय .63.83%

Shot on OnePlus

शाखेचा निकाल 95.72% लागला असून गुणानुक्रमे प्रथम कु.दिव्या लक्ष्मण सरोदे 75.33%. द्वितीय कु. सिद्धी गोपालराव तायडे 75.00%. तृतीय क्रमांक कु. पूनम गणेश भांदुर्गे 73.67%. तर कला शाखेचा निकाल 83.33% टक्के लागला असून प्रथम येण्याचा मान कु. सनीबा हमीदखान पठाण 72.83%. द्वितीय कु. अनन्या गणेश वाठोरे 66.67%.तृतीय कु.सलोनी सिद्धार्थ मोरे 63.83%. या सर्व गुणवंत विद्यार्थिनींचा संस्थेचे अध्यक्ष लोकनेते आदरणीय भाऊसाहेब अनंतरावजी देशमुख. व आदरणीय बाईसाहेब जयश्रीताई देशमुख, युवा नेते एड. नकुल दादा देशमुख यांनी या यशवंत विद्यार्थिनींना शुभेच्छा देत गौरव करत भरभरून कौतुक केले.

तसेच भारत कन्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या सन्माननीय प्राचार्या मंजुषा सु.देशमुख मॅडम, पर्यवेक्षक आदरणीय सुनील डहाळके सर, सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी व पालक या सर्वांनी गुणवंत विद्यार्थिनींचे कौतुक अभिनंदन केले. सर्वत्र स्तरातून या गुणवंत विद्यार्थिनींचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

# सुविधेचा अभाव असलेल्या ग्रामीण भागात मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या डॉक्टरांची धाडसी कामगिरी

## हृदयाभोवती साचलेले १.५ लिटर द्रव काढून वाचवला ३५ वर्षीय रुग्णाचा जीव

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई प्रतिनिधी** : ग्रामीण भागात अत्यावश्यक सुविधा नसतानाही नवी मुंबईतील खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्समधील डॉक्टरांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे एका ३५ वर्षीय क्षयरोग (TB) रुग्णाचा जीव वाचविण्यात यश आले आहे. हृदयाभोवती मोठ्या प्रमाणात द्रव साचल्याने (पेरिकार्डियल इफ्युजन) गंभीर स्थितीत असलेल्या या रुग्णावर डायलिसिस कॅथेटरचा वापर करून यशस्वी उपचार करण्यात आले.

रोहा तालुक्यातील आदिवासी पाड्यातील हा रुग्ण अत्यंत गंभीर अवस्थेत ओपीडीमध्ये दाखल झाला. तपासणीत 'पेरिकार्डियल इफ्युजन' (हृदयाभोवती द्रव साचणे) आणि 'कार्डियाक टॅम्पोनाड' (हृदयावर दबाव येणे) असल्याचे स्पष्ट झाले. या स्थितीत तातडीने द्रव काढणे आवश्यक होते, अन्यथा रुग्णाचा मृत्यू होऊ शकत होता.



रुग्ण श्री मनोहर पवार हे क्षयरोगाशी संबंधित गुंतागुंतींमुळे अत्यंत अशक्त झाले होते. त्यांना श्वास घेण्यास तीव्र त्रास होत होता, रक्तदाब कमी झाला आणि ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते. रोहा परिसरात ७०–८० किमी अंतरावरही कार्डियाक सेंटर किंवा कॅथलॅब उपलब्ध नसल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली होती.

सुरुवातीला रुग्णाला संवेदन नर्सिंग होम येथे दाखल करण्यात आले, जिथे रोहा येथी डॉ. मनीष वैरागी (मधुमेह तज्ज्ञ व जनरल फिजिशियन) यांनी तातडीने उपचारास सुरुवात केली त्यानंतर काही दिवसांनी रुग्णाला मेडिकव्हरच्या आउटरीच ओपीडीत जाण्याचा सल्ला दिला. तिथे डॉ. अनुप महाजनी (कार्डिओलॉजिस्ट, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, खारघर) यांनी तातडीने २डी इकोकार्डिओग्राफी करून हृदयाभोवती जवळपास १.५ ते २ लिटर द्रव साचल्याचे निदान केले.

साधारणपणे ही प्रक्रिया कॅथलॅबमध्ये विशेष उपकरणांसह केली जाते. मात्र, त्या ठिकाणी अशी कोणतीही सुविधा नसताना डॉ. महाजनी यांनी डायलिसिस कॅथेटरचा वापर करून 'पेरिकार्डिओसेंटेसिस' ही प्रक्रिया केली. अल्ट्रासाऊंडच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी काळजीपूर्वक १.५ लिटर द्रव यशस्वीपणे बाहेर काढला.

या प्रक्रियेनंतर रुग्णाचा रक्तदाब १००/७० mmHg पर्यंत सुधारला, श्वासोच्छवास सुरळीत झाला आणि तो शुद्धीवर आला. ही परिस्थिती हाताळणे अतिशय आव्हानात्मक होती. आवश्यक उपकरणे नसतानाही योग्य निर्णय घेऊन प्रसंगावधान राखत डॉक्टरांनी रुग्णाचा जीव वाचवला,असे डॉ. अनुप महाजनी यांनी स्पष्ट केले.

रोहा येथील संवेदन नर्सिंग होममधील मधुमेह तज्ञ आणि फिजिशियन डॉ. मनीष के. वैरागी म्हणाले, या रुग्णाचा वैद्यकीय प्रवास अतिशय गुंतागुंतीचा आणि आव्हानात्मक होता. सुरुवातीला त्यांना आमच्या रुग्णालयात अत्यंत गंभीर अवस्थेत दाखल करण्यात आले होते, तेव्हा त्यांचा रक्तदाब मोजता येत नव्हता आणि ऑक्सिजन सॅचुरेशन कमी झाले होते. सखोल तपासणी केल्यानंतर आमच्या लक्षात आले की, त्यांना क्रॉनिक पॅनक्रियाटायटिसचा (दीर्घकालीन स्वादुपिंडाचा दाह) त्रास होता, ज्यासोबत वारंवार होणारा प्लुरल इफ्युजन (फुफ्फुसाच्या आवरणातील द्रव साचणे) आणि गंभीर पेरिकार्डियल इफ्युजन (हृदयाभोवतीच्या आवरणातील द्रव साचणे) यांसारख्या गुंतागुंती होत्या, तसेच सेप्टिसेमिक शॉक (रक्तविषारामुळे आलेला धक्का) देखील होता. गेल्या काही महिन्यांत, वेगवेगळ्या केंद्रांवर त्यांच्यावर अनेक वेळा प्लुरल टॅपिंग प्रक्रिया करण्यात आले होते, परंतु मूळ कारणावर पूर्णपणे उपचार न झाल्यामुळे त्यांच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा होत नव्हती. आमच्या रुग्णालयातील आयसीयू उपचाराने सुरुवातीला प्रकृतीत सुधारणा होऊनही, आर्थिक मर्यादा आणि उपचार थांबवल्यामुळे रुग्णाची प्रकृती आणखी खालावली आणि त्यांना पुन्हा रुग्णालयात दाखल करावे लागले.

डॉ. मनीष पुढे सांगतात की,* त्यांच्या रुग्णालयातील वास्तव्यादरम्यान, हृदयाभोवतीच्या आवरणातील द्रव (पेरिकार्डियल फ्लुइड) तातडीने काढून टाकण्याची गरज हे एक मोठे आव्हान होते. ही सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध नव्हती आणि रुग्णाचे कुटुंबीय आर्थिक व भावनिक कारणांमुळे त्यांना टर्शियरी केअर सेंटरमध्ये दाखल करण्यासाठी तयार नव्हते. डॉ. प्रीतीश बागुल आणि नंतर डॉ. अनुप महाजानी यांसारख्या तज्ज्ञांच्या मदतीने, मोठ्या प्रमाणात द्रव काढून जीवनरक्षक पेरिकार्डिओसेंटेसिस प्रक्रिया पार पाडण्यात आली आणि रुग्णाची प्रकृती स्थिर करण्यात आली. हे प्रकरण उपचारांमधील सातत्य, वेळीच उपचार आणि तज्ज्ञांमधील एकत्रित प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित करते. मी आमच्या टीममधील डॉ. भूषण खारीवाले, डॉ. प्रगती देशमुख, डॉ. ऐश्वर्या पाटील आणि आमच्या नर्सिंग स्टाफचेही आभार मानतो. आता रुग्णाची प्रकृती पूर्णपणे स्थिरावली आहे.

या उपचारानंतर रुग्णाच्या प्रकृतीत सुधारणा होऊन डॉ. मनीष यांच्याकडे पुढील उपचार व फॉलो-अप देखील घेत आहे. सध्या रुग्णाच्या प्रकृती सुधारणा झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

माझी प्रकृती अचानक खालावल्याने मला श्वास घेण्यासही अडचणी येत होत्या. डॉक्टरांनी वेळीच उपचार केल्यामुळे आज माझा जीव वाचला, *अशी प्रतिक्रिया रुग्ण श्री मनोहर पवार यांनी व्यक्त केली.

मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नवी मुंबईचे सेंटर हेड संदीप जोशी सांगतात की,* ग्रामीण व दुर्लक्षित भागांपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. योग्य वेळी योग्य उपचार मिळाल्यास एखाद्या रुग्णाचा जीव वाचू शकतो, हे या घटनेतून स्पष्ट होते.ही घटना ग्रामीण भागातही तातडीच्या वैद्यकीय निर्णयक्षमतेचे आणि तज्ज्ञांच्या धाडसाचे महत्त्व अधोरेखित करते.

---

# कोराडीमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज चषक' राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा थरार

## सेलिब्रिटींसह मान्यवरांच्या उपस्थितीने अंतिम सामना ठरला अविस्मरणीय!

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : कोराडी, नागपूर येथे उपसंचालक कार्यालय (क्रीडा व युवक सेवा), नागपूर विभाग तसेच ऍमॅच्युअर कबड्डी असोसिएशन ऑफ विदर्भ आणि नागपूर ग्रामीण कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज चषक' राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा अंतिम सामना अत्यंत उत्साहपूर्ण आणि जल्लोषमय वातावरणात संपन्न झाला. राज्यभरातील उत्कृष्ट कबड्डी संघांच्या सहभागामुळे स्पर्धेला विशेष रंगत प्राप्त झाली होती.

अंतिम सामन्यात खेळाडूंनी दाखवलेल्या चपळाई, ताकद, रणनीती आणि जिद्दीमुळे उपस्थित प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवले. प्रत्येक चढाई आणि पकडीला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त दाद मिळत होती. थरारक आणि रोमांचक वातावरणात पार पडलेला हा अंतिम सामना क्रीडाप्रेमींसाठी




संस्मरणीय ठरला.

या भव्य सोहळ्याला बॉलिवूडचे सुप्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख, अभिनेत्री मेघा धाडे तसेच माजी खासदार नवनीत रवी राणा यांनी उपस्थित राहून स्पर्धेची शोभा वाढवली. मान्यवरांनी सामन्याचा मनमुराद आनंद घेत खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक केले आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आ. समीर मेघे, नागपूर शहरच्या महापौर निताताई ठाकरे, माजी आमदार सुधाकरजी कोहळे, मनपा सभापती मंगलाताई खेकरे, भाजप जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत, महामंत्री अनिलजी निधान, अखिल भारतीय कबड्डी असोसिएशनचे महासचिव जितेंद्रसिंग ठाकूर, महादुला नगरपंचायतच्या नगराध्यक्षा हेमलतताताई सावजी, ज्योती बावनकुळे, लोकेशजी आष्टणकर, पायलताई आष्टणकर, मौदा नगरपंचायतचे नगराध्यक्ष प्रसन्नाजी तिडके, येरखेडा नगरपंचायतचे नगराध्यक्ष राजकिरणजी बर्वे, माजी नगराध्यक्ष राजेशजी रंगारी, भाजप कोराडी मंडळ अध्यक्ष ब्रम्हाजी काळे, भाजप युवामोर्चा अध्यक्ष चेतनजी खडसे, क्रीडा व युवक सेवा नागपूर विभागाच्या उपसंचालक पल्लवीताई धात्रक, वर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी आशाताई मेश्राम, मनपा क्रीडा अधिकारी पियुषजी आंबुलकर, विदर्भ कबड्डी असोसिएशनचे सहसचिव सतीशजी डफले, भाजप तालुका मंडळ अध्यक्ष सचिनजी घोडमारे यांच्यासह अनेक मान्यवर, पदाधिकारी, अधिकारी, कार्यकर्ते, खेळाडू आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या राज्यस्तरीय स्पर्धेमुळे कोराडी परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले असून ग्रामीण भागातील युवा खेळाडूंना आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कबड्डीसारख्या मातीतल्या खेळाला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम भविष्यातील खेळाडूंना प्रेरणादायी ठरणारा असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

---

# ४४ क्रीडा प्रकारांना हक्काच्या गुणांकनासाठी साकडे

## सुमारे ४ लाख खेळाडूंच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न; शिक्षणमंत्र्यांना निवेदन सादर

**दैनिक युवक आधार**
**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : महाराष्ट्र राज्यातील शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या ४४ विविध क्रीडा प्रकारातील खेळाडूंना वाढीव क्रीडा गुणांकन (Grace Marks) मिळावे, या प्रलंबित मागणीसाठी 'शालेय खेळ-क्रीडा संस्था महाराष्ट्र राज्य' आणि संलग्न संघटनांच्या वतीने शालेय शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे यांना त्यांच्या निवासस्थानी निवेदन देण्यात आले. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ४ लाख खेळाडूंच्या शैक्षणिक भवितव्याला मोठी चालना मिळणार आहे.

सन २०१३ मध्ये तत्कालीन क्रीडा मंत्री आणि क्रीडा आयुक्त यांच्या मान्यतेने ४४ क्रीडा प्रकारांचा शालेय क्रीडा स्पर्धेत समावेश करण्यात आला होता. मात्र, अद्याप या खेळाडूंना क्रीडा गुणांकनाचा लाभ मिळत नाही. यासंदर्भात क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे तत्कालीन आयुक्त ओमप्रकाश बकोरिया,



सुहास दिवसे तसेच विद्यमान आयुक्त शितल तेली-उगले आणि सहसंचालक सुधीर मोरे यांनी सकारात्मक अहवाल दिले आहेत. विशेष म्हणजे, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा क्रीडा मंत्री सुनेत्रा अजितदाद पवार यांनी देखील क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई यांना यासंदर्भात महत्त्वाची शिफारस केली आहेसंस्थेचे अध्यक्ष शाम भोसले यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शिक्षणमंत्र्यांची मंत्र्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, ग्रामीण व शहरी भागातील तब्बल लाख खेळाडू या ४४ क्रीडा प्रकारांमध्ये सक्रिय आहेत. शालेय शिक्षण विभागाने या प्रस्तावावर तातडीने मोहोर उमटवून खेळाडूंना न्याय द्यावा, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

याप्रसंगी विविध खेळांचे प्रतिनिधी आणि क्रीडा संघटक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यातमहावीर धुळधर (थांग ता मार्शल आर्ट), रवींद्र चोथवे (फ्लोअर बॉल), मीनाक्षी गिरी (टेनिस क्रिकेट), रॉकी डिसोजा (तेंग सु डो), अशोक फरगडे व अशोक कदम (बुडो मार्शल आर्ट), संजय सरदेसाई (पॉवरलिफ्टिंग), मिलिंद पांचाळ, वैभव सागवेकर व अभिजित पाटील (फिल्ड आर्चरी) यांचा समावेश होता. तसेच मयूर पांचाळ (रोप स्किपिंग), प्रशांत आहेर (ग्रॅपलिंग), विनोद शिंदे (थाय बॉक्सिंग), भागिरथ सुराग, कश्यप भानुशाली व स्वप्नील सुराग (कुडो), दीपक जांभळे व राहुल भोसले (ट्रेडिशनल रेसलिंग), डॉ. त्रिभुवन सिंग (मॉन्टेक्स बॉल क्रिकेट), डॉ. जितेंद्र लिंबकर (स्पीडबॉल), चंद्रकांत घोडेराव व वैभव शिंदे (ड्रॉप रोबॉल) आणि मुंबई उपनगर शिक्षक क्रीडा संघटनेचे प्रतिनिधी शरद वाबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. शालेय शिक्षणमंत्र्यांनी या विषयावर सकारात्मक चर्चा केली असून, लवकरच संबंधित विभागाकडून योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. या निर्णयाकडे आता राज्यातील लाखो खेळाडू आणि पालकांचे डोळे लागले आहेत.

---

# गतिरोधक बसविण्याच्या मागणीसाठी सेलू येथे ठिय्या आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**सेलू (प्रतिनिधी) शिवाजी पवार** : परतूर–मानवत रोड या राज्य महामार्गावरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर गतिरोधक बसविण्याच्या मागणीसाठी सेलू येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयासमोर नागरिकांनी ठिय्या आंदोलन केले.सेलू शहरातून जाणारा सातोना रोड ते परभणी रोड हा अत्यंत वर्दळीचा मार्ग असून या परिसरात शाळा, महाविद्यालये, हॉटेल्स, दुकाने तसेच मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते वालूर नाका या मार्गाचे सिमेंटीकरण झाल्यामुळे वाहनचालक भरधाव वेगाने वाहने चालवत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या अपघातांत अनेकांना जीव गमवावा लागला असून काही जण कायमचे अपंग झाले आहेत.यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार निवेदने देऊनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याने संतप्त नागरिकांनी आज सुमारे एक तास ठिय्या आंदोलन करून निषेध नोंदविला.आंदोलनादरम्यान सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे अभियंता माने यांनी येत्या आठ दिवसांत संबंधित मार्गावर तसेच





छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते वालूर रोड या मार्गावर गतिरोधक बसविण्यात येतील, असे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर नागरिकांनी आंदोलन मागे घेतले.या आंदोलनात जयसिंग शेळके, शिवशंकर मोरे, संतोष निर्वळ, गोविंद हरणे, भरत शेरे, पवन नाईक, समाधान निर्वळ, नितीन होगे, वैभव शेरे, राजू नाईक, मुंजा गाडेकर, गणेश शेवाळे, अक्षय जोशी, विराट तिर्थे, माऊली लेवडे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

---

# रानोमाळ फुलला ' बाहवा '

नकळत येती ओठावरती
तुला पाहता शब्द वाहवा
सोनवर्खिले झुंबर लेउन
दिमाखात हा उभा बहावा

कधी दिसे नववधू बावरी
हळद माखली तनु सावरते
झुळुकीसंगे दल थरथरता
डुल कानिचे जणू हालते

ज्या ज्या वेळी अवघड होई
ग्रीष्माचा तुज दाह सहाया
त्या त्या वेळी अवतरेन मी
बहावा रुपे तुज सुखवाया

मराठी सुप्रसिद्ध निसर्ग कवयित्री इंदिरा संत यांची 'बहावा फुलला' ही रानातील भाव सौंदर्य उलगडणारी कविता ग्रीष्म ऋतूतील उष्ण तापमान निसर्गातील संपूर्ण सजीव सृष्टीला नजरेत सौंदर्य भरतांना आकर्षित करते.

मराठी सहा उप ऋतूतील शिशिर ऋतूत निसर्गातील डोंगराळ भागातील संपूर्ण वृक्ष वनराईची पानझड होते. शिशिर सरल्यानंतर वसंत ऋतूत झाड फुलांनी बहरायला सुरुवात होते करवंद,आंबा मोहोर,पळस ही झाड वसंत ऋतूत वातावरणात फुलांनी बहरून जातात. मात्र 'बाहवा' हे झाड रानात वसंत ऋतूमध्ये पानगळ झाल्यानंतर ग्रीष्म ऋतूत पिवळ्या चमकदार फुलांनी बहरून जाते सकाळच्या कोवळ्या उन्हातील सुर्याची तेजेस्वी लंबरूप किरण जेव्हा निसर्ग सृष्टीवर अवतरतात तेव्हा 'बहावा' पिवळ्या सोनेरी तेजेस्वी फुलांनी सजवलेल्या फांदीवर जणू मखमली झुंबरच टांगल्यावानी शोधून दिसते. झाड तेच चोहीकडे बहर एकच पण पिवळ्या फुलांचा दिमाख मात्र नवा दिवसभर सायंकाळ होईपर्यंत हा देखावा निसर्गात सोनं विखुरल्या वाणी माळरानावर,डोंगराळ भागात देखावा तेवतच राहतो.डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासी महिलांच्या तोंडी आजही बाहव्याच्या झाडा संबंधित मौखिक परंपरेनुसार लोकगीत गातांना लग्नसराईत हळदीच्या कार्यक्रमात आढळतात.

वन वन वं
वनाचं देखणं ये ऽऽ
बाहवी भरली
मंडवळी सजली ये ऽऽ
बाहवी भरली
हळद माखली येऽऽ

आदिवासी पहाडी भागात उन्हाळ्यात लग्न विवाह मोठ्या प्रमाणात होत असतात त्यावेळी निसर्गातील बाहव्याच्या फुला संबंधीत लोकगीत हळदी लावण्याच्या वेळी गायले जाते.बाहव्याची फुलं एप्रिल व मे महिन्यात जंगलात फुलतात. त्याचवेळी गावात नवरदेव किंवा नवरीला हळदीचा कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर बाशींग आणि कपाळी रूईच्या फुलांची सुताच्या धाग्यात (बनवलेली) पोवलेली मंडवळी बांधतात त्या मंडवळीवाणी बाहवा वृक्षाला पिवळी फुलं लांबसर मंडवळी प्रमाणे फुलून खाली लवून आलेली असतात.

आदिवासी भागात बहावा हे झाड औषधी वृक्ष म्हणून परिचित आहे. उन्हाळ्यात झाड फुलांनी आदिवासी शब्द माहेरून मराठीत झडून गेल्यानंतर रानात जणू भुई पखरणच दाटलेली असते.फुलांचा हंगाम संपल्यानंतर बाहव्याला काळ्या रंगाची दंडगोलाकार लांबलचक शेंग लोंबते पीकलेल्या शेंगा फोडून मधुर गाभा कप्प्यातील बीया काढून टाकत रानातील माकडे,कोल्हे,मोहट, पोपट,हारोढ हे पशु पक्षी आवडीने खातात. आता रानात झाडाझुडपात भ्रमंती करताना बाहवा पिवळा रंग परिधान करून रानात डोंगराळ, शहरातही रस्त्याच्या कडेला, बगीच्यात बहरलेला आहे.

**संकलन : सुभाष कामडी**
**( आदिवासी साहित्य अभ्यासक**

# निडी खाडीतील कांदळवनावर घाला; जिल्हा प्रशासनाच्या मौनावर संताप, केंद्राने तातडीने हस्तक्षेप करावा

## रायगड प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रेवदंडा, चौलप्रमाणे निडीतील कांदळवनही उद्ध्वस्त होण्याच्या उंबरठ्यावर

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील निडी गावालगतच्या मुरुड खाडी परिसरातील शासकीय बंधाऱ्याजवळ नैसर्गिक भरती-ओहोटीचा जलप्रवाह अवैधपणे बंद करून कांदळवन नष्ट करण्याचा गंभीर प्रकार सुरू असल्याचा आरोप समोर आला असून, या प्रकरणाने स्थानिक नागरिक, मच्छीमार आणि पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र संताप उसळला आहे. स्थानिक रहिवासी व पर्यावरणाशी थेट निगडीत असलेले प्रकाश चंद्रकांत तांबडे यांनी ग्रुप ग्रामपंचायत साळाव, रायगड जिल्हाधिकारी तसेच संबंधित विभागांकडे लेखी तक्रार दाखल करून तातडीच्या चौकशीची आणि दोषींवर कडक कारवाईची मागणी केली आहे.

तांबडे यांच्या म्हणण्यानुसार, बंधाऱ्यावर भरती-ओहोटीकरिता दरवाजे असूनही काही समाजकंटकांनी समुद्राच्या विरुद्ध दिशेने मोठमोठे दगड रचून हे दरवाजे पूर्णपणे अडवले आहेत. परिणामी कांदळवनाला मिळणारा पाण्याचा प्रवाह खंडित झाला असून, हे नैसर्गिक संपदा क्षेत्र कोरडे पडून नष्ट होण्याच्या टप्प्यावर पोहोचले आहे. हा प्रकार जवळपास दोन महिन्यांपासून सुरू असल्याने पावसाळयात मत्स्यप्रजननावर आणि स्थानिक मासेमारीवर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

जिल्हा प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप ठोस कारवाई न झाल्याने स्थानिकांमध्ये प्रशासनाविरोधात प्रचंड नाराजी



आहे. नागरिकांच्या आरोपानुसार, अनेक तक्रारींनंतरही यंत्रणेने जाणूनबुजून दुर्लक्ष केले असून, पैशाच्या लालसेपोटी संवेदनशील किनारी परिसंस्थेकडे पाठ फिरवली जात असल्याचा संशय निर्माण झाला आहे. हा केवळ निष्काळजीपणा नसून, पर्यावरणीय गुन्ह्यांना अप्रत्यक्ष संरक्षण देण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे, असा संतप्त सूर व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर केवळ रायगड जिल्हा प्रशासनच नव्हे, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारनेही तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी जनतेमध्ये जोर धरू लागली आहे. पर्यावरण संरक्षण, कांदळवन संवर्धन, किनारी नियमन क्षेत्र आणि जैवविविधता रक्षणाशी संबंधित केंद्रीय यंत्रणांनी हा प्रकार गांभीर्याने घेतला नाही, तर सरकारी घोषणा आणि प्रत्यक्ष कृती यामधील दरी पुन्हा एकदा उघडी पडेल, अशी टीका होत आहे.

स्थानिकांच्या मते, मुरुड खाडी हा फक्त जलभाग नाही, तर माशांच्या प्रजननाचा, कांदळवनांच्या वाढीचा आणि किनारी पर्यावरणाच्या संतुलनाचा श्वास आहे. या प्रवाहावर दगड टाकून तो बंद केल्यास कांदळवन कोरडे पडते, त्याची मुळे मरतात आणि त्याबरोबरच मासेमारीचा व्यवसाय, जैवविविधता आणि किनारी संरक्षण यंत्रणा देखील कोलमडते. त्यामुळे हा प्रकार नैसर्गिक साधनसंपत्तीवरील थेट आघात असल्याचे पर्यावरणतज्ज्ञांकडूनही सांगितले जात आहे.

तक्रारदार प्रकाश तांबडे यांनी मागणी केली आहे की, संबंधित बंधारा परिसराची तातडीने पाहणी करून अवैध दगड हटवावेत, जलप्रवाह पूर्ववत करावा, दोषींची ओळख पटवावी आणि वन विभाग, पोलिस तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कठोर कायदेशीर कारवाई सुरू करावी.

कांदळवन नष्ट करणे, नैसर्गिक प्रवाह अडवणे आणि पर्यावरणीय नुकसान घडवणे हा साधा वाद नाही, तर शासनाच्या नियमांना आव्हान देणारा गंभीर अपराध आहे, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

निडी गावातील प्रकार हा स्वतंत्र अपवाद नसून रेवदंडा बायपास, चौल दादर आणि इतर भागांतील कांदळवन तोड, भराव आणि प्रवाह अडविण्याच्या कथित प्रकारांच्या मालिकेतील आणखी एक धोकादायक उदाहरण असल्याचा आरोपही केला जात आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने आता केवळ कागदी हालचाली न करता प्रत्यक्ष जमिनीवर उतरून कारवाई करावी, अशी जनतेची ठाम मागणी आहे.

जनतेचा स्पष्ट संदेश एकच आहे*—कांदळवन वाचले पाहिजे, खाडीचा प्रवाह मुक्त झाला पाहिजे, आणि पर्यावरणाशी खेळणाऱ्यांना कायद्याचा धाक बसलाच पाहिजे. रायगड प्रशासन, राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांनी हा प्रश्न तातडीने हाताळला नाही, तर स्थानिक जनतेचा विश्वास पूर्णपणे ढासळेल, असा इशारा आता अधिक तीव्र झाला आहे.

# कडाक्याच्या उन्हात जनगणनेचे काम; लाखनीतील शिक्षक संतप्त

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे** लाखनी - शासनाच्या आदेशानुसार जनगणनेचे राष्ट्रीय काम सुरू असताना लाखनी तालुक्यातील शिक्षकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, तालुका शाखा लाखनीच्या वतीने नायब तहसीलदार धर्मेंद्र उरकूडकर यांना निवेदन देत विविध मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

उन्हाळ्याच्या सुट्टीत तसेच मे-जून महिन्यातील कडाक्याच्या उष्णतेत जनगणनेचे काम करावे लागत असल्याने शिक्षकांच्या आरोग्य व सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. उष्माघात, अपघात यांसारख्या घटनांचा धोका लक्षात घेता संबंधित



शिक्षकांना विमा संरक्षण लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच शिक्षकांना त्यांच्या मूळ कार्यक्षेत्रात किंवा जवळच्या परिसरातच जनगणनेची नियुक्ती देण्यात यावी, सुट्टीच्या काळात काम घेतल्यास 'अर्जित रजा' मंजूर करावी, डिजिटल जनगणनेसाठी आवश्यक अँड्रॉइड मोबाईल व तांत्रिक साहित्य शासनाने उपलब्ध करून द्यावे, आणि या कालावधीत इतर अशैक्षणिक प्रशिक्षण टाळावे, अशा प्रमुख मागण्या निवेदनातून करण्यात आल्या.

याबाबत तालुका अध्यक्ष केसर मासुरकर यांनी सांगितले की, "शिक्षक राष्ट्रीय कर्तव्यापासून कधीही पळ काढत नाहीत. मात्र त्यांच्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र भूमिका घ्यावी लागेल."

दरम्यान, जनगणना अधिकारी मनीष अवसरे यांनी शिक्षकांच्या अडचणींची दखल घेत, "सर्व मागण्यांचा अहवाल वरिष्ठांकडे सादर करण्यात येईल. कामाचे नियोजन करताना शिक्षकांना कमीत कमी त्रास होईल, यासाठी प्रशासन प्रयत्नशील राहील," असे आश्वासन दिले.

या वेळी शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष उमेश सिंगनजुडे, तालुका अध्यक्ष केसर मासुरकर, सरचिटणीस जय राठोड, सचिन शेळके, सूर्यभान टिचकुले यांच्यासह अनेक शिक्षक उपस्थित होते.प्रशासनाच्या भूमिकेकडे आता लाखनी तालुक्यातील शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

# 'धन्यवाद देवाभाऊ!'; नागपूरच्या विद्यार्थिनींनी मानले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर:** विदर्भातील रणरणत्या उन्हात शासकीय वसतिगृहातील विद्यार्थिनींना मोठा दिलासा देणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन, नागपूरच्या विद्यार्थिनींनी आज त्यांचे प्रत्यक्ष आभार मानले. "आमची समस्या एका मोठ्या भावाच्या मायेने समजून घेतली," अशा भावूक शब्दांत विद्यार्थिनींनी आपल्या भावना व्यक्त करत मुख्यमंत्र्यांना 'धन्यवाद देवाभाऊ' असे पत्रक सोपवले.बेसा, नागपूर येथील १ हजार मुलींच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थिनींना कडक उन्हामुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. वसतिगृहाच्या जुन्या नियमांनुसार कुलर लावण्यासंदर्भात कोणतीही तरतूद नसल्याने, प्रशासकीय स्तरावर वारंवार मागणी करूनही अधिकारी कुलर लावण्यास



नकार देत होते. विदर्भातील वाढत्या तापमानामुळे अनेक मुलींना उष्णतेमुळे त्वचेचे आजार (इन्फेक्शन) झाले होते, तर परीक्षेच्या काळात अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे कठीण झाले होते. ही गंभीर समस्या भाजप शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या मार्गदर्शनात आणि नगरसेवक रितेश गावंडे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री कार्यालयाकडे पोहोचवण्यात आली होती. निवेदनातील गांभीर्य ओळखून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ मुख्यमंत्री कार्यालयातील सचिव आणि समाज कल्याण विभागाला कारवाईचे आदेश दिले. विदर्भातील उन्हाची तीव्रता लक्षात घेता, त्यांनी जुन्या जाचक नियमावलीत शिथिलता आणून नागपूरमधील वसतिगृहांसाठी ६०० कुलर आणि संपूर्ण विदर्भातील वसतिगृहात कुलरची व्यवस्था करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.मुख्यमंत्र्यांच्या या निर्णयामुळे भारावलेल्या आकांक्षा उके, सानिया देवगडे, माई बनसोड, श्रावणी सुतार, तृप्ती नंदेश्वर व इतर विद्यार्थिनींनी भाजप युवती प्रमुख प्रशंसा भोयर यांच्या सोबत प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे ऋण व्यक्त केले. "आमचा एक-एक दिवस मरणासन्न अवस्थेत जात होता, मात्र मुख्यमंत्र्यांनी आमच्या विनंतीची दखल घेऊन तत्काळ निर्णय घेतला, यामुळे आम्हाला मोठा आधार मिळाला आहे. परीक्षेच्या काळात आपण दिलेली ही 'कुलरची सावली' आम्हाला अधिक जोमाने अभ्यास करण्यास नक्कीच मदत करेल," असे पत्रक विद्यार्थिनींनी मुख्यमंत्र्यांना दिले. प्रशासकीय दिरंगाई बाजूला सारून एका संवेदनशील लोकनेत्याने घेतलेल्या या 'सुपरफास्ट' निर्णयाचे संपूर्ण नागपुरात स्वागत होत आहे.

# "पेट्रोल पंपांवरील लूट थांबवा!" – वाशिम जिल्ह्यात मनसेचा जोरदार एल्गार; अनियमिततेविरोधात प्रशासनाला अल्टिमेटम

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्ह्यातील पेट्रोल पंपांवर ग्राहकांची होत असलेली कथित फसवणूक, नियमांचे सर्रास उल्लंघन आणि मूलभूत सुविधांचा अभाव या गंभीर मुद्द्यांवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला थेट इशारा दिला आहे. जिल्ह्यातील विविध भागांतील पेट्रोल पंपांवरील अनियमिततेविरोधात मनसेने जिल्हाधिकाऱ्यांकडे सविस्तर तक्रार दाखल करत तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

जिल्हाध्यक्ष राजू भाऊ किडसे आणि जिल्हा सचिव गजानन वैरागडे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा उपाध्यक्ष उमेश टोलमारे यांच्या नेतृत्वात हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष विठ्ठल राठोड, महिला सेना तालुकाध्यक्ष पुष्पा रोदळे, शहर उपाध्यक्ष आकाश लोलप यांच्यासह मनसेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मनसेने दिलेल्या निवेदनात वाशिम शहर, रिसोड, मालेगाव, करंजा तसेच वाशिम–मंगरूळपेठ मार्गावरील




अनेक पेट्रोल पंपांवर गंभीर अनियमितता होत असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. ग्राहकांसाठी मोफत उपलब्ध असणाऱ्या टायरमध्ये हवा भरणे, स्वच्छ पिण्याचे पाणी आणि स्वच्छ शौचालय या मूलभूत सुविधा प्रत्यक्षात दिल्या जात नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. विशेष म्हणजे, या सुविधा मागितल्यास ग्राहकांना नकार दिला जातो किंवा त्यासाठी अतिरिक्त शुल्क आकारले जाते, ही बाब अधिक गंभीर असल्याचे मनसेने नमूद केले आहे.

याशिवाय, अनेक पेट्रोल पंपांवर "२४ तास सेवा" असे फलक लावलेले असतानाही प्रत्यक्षात रात्री ९ ते १० नंतर पंप बंद ठेवले जात असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. या प्रकारामुळे रुग्णवाहिका सेवा, मालवाहतूक करणारे ट्रक चालक तसेच रात्री प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, ही बाब जीवितहानीस कारणीभूत ठरू शकते, अशी गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

मनसेने या सर्व प्रकारांना तेल कंपन्यांच्या नियमांचे उघड उल्लंघन ठरवत इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम यांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे तसेच पेट्रोलियम अँड एक्सप्लोसिव्ह सेफ्टी ऑर्गनायझेशन (PESO) च्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप केला आहे.

**मनसेच्या प्रमुख मागण्या:**

१)जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांची तात्काळ सखोल तपासणी करण्यात यावी.

२)मोफत सुविधा न देणाऱ्या व नियमभंग करणाऱ्या पंपांवर कठोर कारवाई (दंड, परवाना निलंबन) करावी.

३)सर्व पंपांवर ग्राहकांसाठी मोफत सुविधा सक्तीने उपलब्ध करून देण्याचे आदेश द्यावेत.

४)"२४ तास सेवा" फलक लावणाऱ्या पंपांनी प्रत्यक्षात सेवा सुरू ठेवावी, यासाठी तेल कंपन्यांना निर्देश द्यावेत.

मनसे वाशिम जिल्हा युनिटने स्पष्ट इशारा दिला आहे की, हा प्रश्न जनतेच्या मूलभूत सुविधांशी संबंधित असल्याने संघटना याकडे गांभीर्याने लक्ष ठेवणार आहे. प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलली नाहीत, तर पुढील काळात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, संबंधित तेल कंपन्यांचे अधिकारी तसेच PESO नागपूर कार्यालयाला पाठवण्यात आल्या आहेत. नागरिकांनीही अशा प्रकारांविरोधात पुढे येऊन तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन मनसेकडून करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील लाखो वाहनधारक, प्रवासी आणि आपत्कालीन सेवांसाठी पेट्रोल पंपांचे महत्त्व लक्षात घेता मनसेची ही कारवाई दिलासा देणारी ठरत आहे.

आता प्रशासन या प्रकरणाकडे किती गांभीर्याने पाहते आणि कितपत जलद कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नेपाळमधील आशियाई सवात चॅम्पियनशिपमध्ये भारताचा डंका

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** नेपाळमधील काठमांडू युनिव्हर्सिटी, धुलीखेल येथे ३० एप्रिल ते ३ मे २०२६ या कालावधीत पार पडलेल्या '७ व्या आशियाई व इंटरनॅशनल *सवात* चॅम्पियनशिप २०२६' मध्ये भारतीय खेळाडूंनी देदीप्यमान कामगिरी करत आंतरराष्ट्रीय स्तरावर तिरंगा अभिमानाने फडकवला आहे. या स्पर्धेत पदकांची लयलूट करणाऱ्या मास्टर भूपेंद्र मार्शल आर्ट स्पोर्ट्स अँड फिटनेस अकॅडमीच्या (MBMA) आणि महाराष्ट्राच्या सर्व विजयी खेळाडूंचा मंगळवार, ५ मे २०२६ रोजी पनवेलमध्ये भव्य सत्कार समारंभ व पत्रकार परिषद उत्साहात पार पडली.

या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताकडून एकूण ७१ खेळाडूंनी सहभाग घेतला होता, त्यामध्ये महाराष्ट्रातील २४ खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत २ सुवर्ण, ७ रौप्य आणि १५ कांस्य पदके जिंकली. विविध राज्यातील खेळाडूंच्या एकत्रित योगदानामुळे भारताने आशियाई स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाची ट्रॉफी पटकावण्याचा बहुमान मिळवला. महाराष्ट्राच्या गार्गी कुलकर्णी आणि अंजली चव्हाण यांनी सुवर्णपदकाला गवसणी घातली, तर आकांक्षा भालेकर, आर्या पवार, समृद्धी जुगदार, शिवम पाटील, श्रुतिका जाधव, वैष्णवी शिंदे आणि सार्थक महामुनी यांनी रौप्य पदके पटकावली. तसेच ऐश्वर्या नायक, अस्मि पाटील, वरद शेटे, मकरंद जुगदार, ध्रुव दिघाडे, अविर बनसोडे, प्रमोद ठोंबरे, आदित्य खंडीझोड, यश मोरे, ध्रुव कोलतेकर, ईश्वरी डेरे आणि स्वयम् शिंदे यांनी कांस्य पदक जिंकून देशाचे नाव उंचावले. 'हिमालयन इंटरनॅशनल सवात चॅम्पियनशिप' मध्ये सिद्धी जोगदार, मंथन रोटे आणि आराध्या भोसले यांनी कांस्य पदकाची कमाई केली.



पनवेल येथील खांदा कॉलनीतील सीकेटी कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित या कार्यक्रमात अकॅडमीच्या खेळाडूंचे टाळ्यांच्या कडकडाटात जल्लोषात स्वागत करण्यात आले. या यशानंतर खेळाडूंची भव्य विजय मिरवणूक काढण्यात आली, ज्यामध्ये स्थानिक नागरिक आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सत्कार समारंभानंतर आयोजित पत्रकार परिषदेत प्रशिक्षक आणि खेळाडूंनी आपले अनुभव मांडले. आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळताना आलेले दडपण आणि त्यावर मात करून मिळवलेले यश हा प्रवास अत्यंत कठीण पण प्रेरणादायी असल्याचे खेळाडूंनी सांगितले.

या यशात खेळाडूंसोबतच प्रशिक्षक आणि पंचांचेही मोठे योगदान राहिले. राष्ट्रीय संघ प्रशिक्षक सुहास धाईंजे, आशिया पंच राहुल पवार आणि भूपेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी हा विजय साकारला. तसेच भूपेंद्र शिवाजी गायकवाड, धनेशा शिंगोटे, राहुल पवार आणि सुशांत पोळ यांनी जज व रेफ्री म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट जबाबदारी पार पाडली.

आशियाई स्तरावरील या घवघवीत यशानंतर आता भारतीय खेळाडूंचे लक्ष्य सप्टेंबर २०२६ मध्ये फ्रान्स येथे होणाऱ्या *'सवात वर्ल्ड चॅम्पियनशिप'* कडे लागले आहे. "आता आशियानंतर जग जिंकायचं" या निर्धाराने खेळाडू अधिक जिद्दीने सरावाला लागले आहेत.

# लोकशाहीवादी आणि समाजसुधारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज

**जन्म २६ जून इ.स. १८७४ -निधन ६ मे १९२२**

लोकशाहीवादी आणि समाजसुधारकराजर्षी छत्रपती शाहू महाराज हे खरे लोकशाहीवादी आणि समाजसुधारक मानले जातात. शाहू महाराज हे एक सक्षम राज्यकर्ते होते. त्यांच्या राजवटीत शाहू महाराजांनी अनेक पुरोगामी धोरणे यशस्वीपणे राबवली. १८९४ मधील त्यांच्या राज्याभिषेकापासून ते १९२२ मध्ये त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी राज्यातील मागास जातींतील लोकांसाठी काम केले. जात-पंथाची पर्वा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य होते.

**फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र"**

ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली, तसेच समाजातील उच्च वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित (अस्पृश्य) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना "राजर्षी" ही पदवी त्यांच्या राज्यभिषेकाच्या वेळी त्यांना त्याच्या क्षात्र गुरुने दिली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास "फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र" असे म्हणतात.

**जीवन**

छत्रपति शाहू महाराज भोसले (जून २६, इ.स. १८७४ - मे ६, इ.स. १९२२), छत्रपती शाहू महाराज, राजर्षी शाहू महाराज, कोल्हापूरचे शाहू व चौथे शाहू नावांनीप्रसिद्ध, हे मराठ्यांच्या भोसले घराण्यातील कोल्हापूर संस्थानाचे राजे (राज्यकाळ १८९४ - १९००) आणि पहिले छत्रपती (१९००-१९२२) होते.

शाहू महाराजांचा जन्म २६ जून इ.स. १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत, त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव (आप्पासाहेब) तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले, व 'शाहू' हे नाव ठेवले. सन १८८९ ते १८९३ या चार वर्षांच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि शारीरिक विकास झाला. शिक्षण चालू असतानाच १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या मुलीशी शाहू विवाहबद्ध झाले. या वेळी त्यांचे वय १७ वर्षांचे होते आणि लक्ष्मीबाई वय १२ वर्षांहून कमी होते.

२ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर इ.स. १९२२ सालापर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते. मुंबई येथे ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले.

**वेदोक्त वाद**

राजघराण्यातील ब्राह्मण पुरोहितांनी वैदिक स्तोत्रानुसार ब्राह्मणेतरांचे संस्कार करण्यास नकार दिल्याने शाहूंनी आर्य समाज आणि सत्यशोधक समाजाला पाठिंबा देण्याबरोबरच मराठा समाजाच्या हक्कांसाठी प्रचार केला.

त्यांनी पुजाऱ्यांना हटवून क्षात्रजगद्गुरू (क्षत्रियांचे विश्व गुरू) ही पदवी देऊन एका तरुण मराठाची ब्राह्मणेतरांचे धर्मगुरू म्हणून नियुक्ती करण्याचे धाडसी पाऊल उचलले. याला वेदोक्त वाद म्हणून ओळखले जाते. ते लवकरच ब्राह्मणेतर चळवळीचे नेते बनले आणि मराठ्यांना त्यांच्या झेंड्याखाली एकत्र केले.

**कार्य**

शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स. १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. इ.स. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी इ.स. १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेले वेदोक्त प्रकरण शाहू महाराजांच्याच काळात झाले.

**शिक्षण**

त्यांचे शिक्षण ब्रिटिश अधिकारी फ्रेजर यांच्या हाताखाली झाले. पुढील शिक्षण राजकोटच्या राजकुमार कॉलेज मध्ये व धारवाड येथे झाले. अभ्यास व् शैक्षणिक सहलीद्वारे मिळालेले व्यवहारज्ञान यामुळे शाहूराजे यांचे व्यक्तिमत्त्व विकसित झाले होते. १८९६चा दुष्काळ व नंतर आलेली प्लेगची साथ या काळात त्यांची कसोटी लागली आणि त्याला ते पूर्णपणे उतरले. दुष्काळी कामे, तगाईवाटप, स्वस्त धान्यदुकाने, निराधार आश्रमाची स्थापना हे कार्य पाहता 'असा राजा होणे नाही' असेच प्रजेला वाटते.

**शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल**

शाहुपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देणे अशा उपक्रमांतूनही त्यांनी कृषिविकासाकडे लक्ष पुरवले.

त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी, तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठीही सहकार्य केले होते. त्यांनी चित्रकार आबालाल रहिमान यांच्यासारख्या कलावंतांना राजाश्रय देऊन प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली.

**समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता**

स्वातंत्र्यापूर्वी कैक वर्षे आधी समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्त्वे शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. म्हणूनच त्यांचा देशभरात '*महाराजांचे महाराज*' असा गौरव होतो. रयत प्रजा व उपेक्षित समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य शाहूंनी केले आपल्या संपूर्ण जीवन कार्यामध्ये त्यांनी समाजातील बहुजन समाजाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या अधिकाराचा पूर्णपणे वापर केला म्हणूनच ते लोककल्याणकारी राज्यकर्ते ठरले. त्यांच्या कार्याचा गौरव समकालीन लेखकांनी व इतिहासकारांनी केलेला आहे

**कारकीर्द**

महाराजांनी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी तळमळ होती. म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. तसेच ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळा काढल्या. जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रू. दंड आकरण्याची कायदेशीर तरतूद केली.




त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी बनवण्याचे ठरवले. त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले, दुकाने हॉटेल्स काढण्यासाठी प्रोत्साहन दिले, तसेच आर्थिक मदत देखील देऊ केली. अस्पृश्यांना शिवण यंत्रे देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली गंगाधर कांबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्य वस्तीत चहाचे दुकान काढून दिले अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी महार पैलवानांना पैलवान चांभार यांना सरदार अभंग यांना पंडित अशा पदव्या दिल्या अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली.

**अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा**

अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा व कार्याचा वारसा समर्थपणे चालवणारा राजा म्हणून आपली ओळख निर्माण केली. सामाजिक बंधुभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रीडा व आरोग्य इत्यादी महत्त्वपूर्ण क्षेत्रामध्ये अद्वितीय स्वरूपाचे कार्य केले.

**आरक्षण चे जनक**

मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे. हा व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली व तिची त्वरित अंमलबजावणी करून संबंधत अधिकाऱ्याकडून अहवाल मागविले. शाहूंच्या या निर्णयाला तेंव्हा अनेक उच्चवर्णीय पुढाऱ्यांनी विरोध केला. त्या काळात अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीच्या लोकांसाठी नोकरीमध्ये राखीव जागांची तरतूद करून सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या. शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी (तत्कालीन) अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश त्यांनी कोल्हापूर संस्थानात काढला. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठीही कायद्याची निर्मिती केली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी इ.स. १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली.

**जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा**

त्याकाळी धर्माच्या नावाखाली देवांना मुले-मुली वाहण्याची विचित्र पद्धत भारतात चालू होती. परंतु राजांनी आपल्या संस्थानात जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा करून ही पद्धत बंद पाडली. जातिभेदाचे प्रस्थ नष्ट व्हावे म्हणून आपल्या संस्थानात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशर मान्यता दिली. तसा कायदा पारित केला आणि याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना आपल्या चूलत बहीणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. एवढेच नव्हे तर संस्थानात जवळजवळ १०० मराठा-धनगर विवाह घडवून आणले. अशा अनेक कार्याच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांना सन्मानाची वागणूक व दर्जा मिळवून दिला.

**हजेरी पद्धत बंद**

तत्कालीन परिस्थितीमध्ये जातिव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण, सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारला, त्यामुळे त्यांचे जीवन नैराश्यमय झाले. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी चोऱ्या, दरोड्यांचा मार्ग अवलंबला. त्यामुळे ब्रिटिश सरकारने या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावावी लागत असे. शाहू राजांना या लोकांविषयी कणव होती. कारण ते खऱ्या अर्थाने वंचितांचे राजे होते. त्यामुळे शाहूंनी हजेरी पद्धत बंद केली. या जाती जमातींच्या लोकांना एकत्रित करून गुन्हेगारीपासून त्यांना परावृत्त केले. त्यांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार, रथाचे सारथी निर्माण केले. त्यांना घरे बांधून दिली. वणवण भटकणाऱ्या लोकांच्या राहण्याची सोय झाली. पोटापाण्याची सोय झाली. त्यामुळे गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेल्या लोकांना माणूस म्हणून समाजात सन्मानाने वावरता येऊ लागले.

**सत्यशोधक चळवळ**

वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त संघर्ष राजर्षी शाहूंच्याच काळात झाला. हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वादळच होते. या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ आणखी प्रखर झाली. बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना त्यांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली. त्यांनी सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य केले.

गुन्हेगारांना शासन करणारा सत्ताधीश सर्वत्र पहायला मिळेल. मात्र त्यांना प्रेमाने, मायेने आपलेसे करून समाजात सामाजिक दर्जा देणारा व त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणारा राजा विरळाच. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त संघर्ष राजर्षी शाहूंच्याच काळात झाला. हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वादळच होते. या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ आणखी प्रेरित झाली. बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना त्यांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली. त्यांनी सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य केले. कोल्हापूर संस्थानांमध्ये सत्यशोधक चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याचे ही महत्त्वाची जबाबदारी राजर्षी शाहू महाराजांनी पार पडली त्यांच्या नेतृत्वाखालीच संपूर्ण कोल्हापूर संस्थानांमध्ये सत्यशोधक चळवळ उभी राहिली आणि ती नेटाने पुढे नेण्याची कामगिरी देखील पार पाडली गेली. पुढे या चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याची महत्त्वाची जबाबदारी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी पार पाडली यासाठी त्यांनी शिक्षणातून बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास हे सूत्र अंगिकारले.

**"दलितांचा नेता"**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

दलित पीडित उपेक्षित समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला यामागे खरी प्रेरणा ही राजर्षी शाहू, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची होते. बाबासाहेब आंबेडकरांना माणगावच्या परिषदेमध्ये "दलितांचा नेता" व "भारतीय अग्रणी नेता" म्हणून घोषित केले. यापुढील काळामध्ये बाबासाहेबांनी दलित उपेक्षित समाजाचे नेतृत्व करावं असे आवाहनही महाराजांनी केले. शाहू यांनी सर्व उपेक्षित समाजातील व अस्पृश्य वर्गातील लोकांना आपल्या संस्थानामध्ये आरक्षणाद्वारे नोकऱ्या देण्याचा प्रयत्न केला यादृष्टीने संपूर्ण भारतामध्ये आरक्षणाचे जनक म्हणून त्यांचा गौरव केला जातो. सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन शाहूराजांनी सामाजिक समतेसाठी प्रयत्न केले.

**कलावंतांना राजाश्रय**

शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रांतील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्कार्य केले.

महाराजानी कोल्हापूर, बेळगाव या भागातील स्वातंत्र्यवीराना वेळोवेळी आर्थिक व इतर मदत केली. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध चांगले होते. डॉ. बाबासाहेबांनी 'मूकनायक' हे पाक्षिक ३१ जानेवारी १९२०ला प्रथम प्रकाशित केले. परंतु आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद पडले. परंतु हे राजर्षी शाहू महाराजांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तत्काळ आर्थिक मदत केली.

**जातिभेदाविरुद्ध लढा**

राजर्षी शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. त्यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील घाटगे घराण्यात झाला. महाराजानी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. त्यांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. आंतरजातीय विवाहांचा पुरस्कार केला व त्यासंबंधी कायदा आणला,आपल्या कृतीतूनच संदेश जावा यासाठी आपल्या चुलतबहिणीचा विवाह त्यांनी आंतरजातीय केला,अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दुष्ट पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा, बहुजन विद्यार्थ्यांसाठी वैदिक पाठशाळा, संस्कृत भाषेच्या विकासासाठी संस्कृत शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले.

**शैक्षणिक कार्य**

शाहू महाराजांनी खालील शाळा सुरू केल्या. १. प्राथमिक शाळा २. माध्यमिक शाळा ३. पुरोहित शाळा ४. युवराज/ सरदार शाळा ५. पाटील शाळा ६. उद्योग शाळा ७. संस्कृत शाळा ८. सत्यशोधक शाळा ९. सैनिक शाळा १०. बालवीर शाळा ११. डोंबारी मुलांची शाळा १२. कला शाळा सुरू केल्या.

**शैक्षणिक वसतिगृहे**

शाहू महाराजांनी सुरू केलेली शैक्षणिक वसतिगृहे खालीलप्रमाणे आहेत.

१. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस (१९०१) २. दिगंबर जैन बोर्डिंग (१९०१) ३. वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह (१९०६) ४. मुस्लिम बोर्डिंग (१९०६) ५. मिस क्लार्क होस्टेल (१९०८) ६. दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग (१९०८) ७. श्री नामदेव बोर्डिंग (१९०८) ८. पांचाळ ब्राह्मण वसतिगृह (१९१२) ९. श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह (१९१५) १०. इंडियन ख्रिश्चन होस्टेल (१९१५) ११. कायस्थ प्रभू विद्यार्थी वसतिगृह (१९१५) १२. आर्यसमाज गुरुकुल (१९१८) १३. वैश्य बोर्डिंग (१९१८) १४. ढोर चांभार बोर्डिंग (१९१९) १५. शिवाजी वैदिक विद्यालय वसतिरगृह (१९२०) १६. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस (१९२०) १७. इंडियन ख्रिश्चन होस्टेल (१९२१) १८. नाभिक विद्यार्थी वसतिगृह (१९२१) १९. सोमवंशीय आर्यक्षत्रिय बोर्डिंग (१९२०) २०. श्री देवांग बोर्डिंग (१९२०) २१. उदाजी मराठा वसतिगृह, नाशिक (१९२०) २२. चौथे शिवाजी महाराज मराठा वसतिगृह, अहमदनगर (१९२०) २३. वंजारी समाज वसतिगृह, नाशिक (१९२०) २४. श्री शाहू छत्रपती बोर्डिंग, नाशिक (१९१९) २५. चोखामेळा वसतिगृह, नागपूर (१९२०) २६. छत्रपती ताराबाई मराठा बोर्डिंग, पुणे (१९२०) आणि इतर ठिकाणी वसतिगृहे सुरू करण्यात आली होती.

**कलेला आश्रय**

राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रांतील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वाचे कार्य केले.

**स्वातंत्रलढ्यातील योगदान**

महाराजांनी कोल्हापूर, बेळगाव या भागातील स्वातंत्र्यवीराना वेळोवेळी आर्थिक व इतर मदत केली. शाहू महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. डॉ. बाबासाहेबांनी 'मूकनायक' हे पाक्षिक ३१ जानेवारी १९२०ला प्रथम प्रकाशित केले. परंतु आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद पडले. परंतु हे राजर्षी शाहू महाराजांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तात्काळ २५०० रुपयांची भरघोस मदत केली.अश्या ह्या लोकशाहीवादी आणि समाजसुधारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना १०४ व्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन

**डॉ सुनिल भगत**
**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती**
**नागपूर**